# माणूस

शनिवार । १० जून १९७८ । ७५ पैसे

दोन्ही कॉंग्रेसच्या
विलिनीकरणाचा प्रयोग
महाराष्ट्रापुरताच करून पहावा
असे इंदिरा गांधींनी म्हटले.
या मागील कारणे कोणती ?

दादा मंत्रिमंडळ का टिकून आहे ?
कोसळण्याची शक्यता किती ?
विशेष वार्तापत्र

—माहितगार

पृष्ठ....६

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# इंदिरा गांधी यांचे जगजीवनराम यांना आमिष

जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर आणि केंद्रीय गृहमंत्री चरणसिंग यांच्यातील वाग्युद्ध निकराला आलेले असून, हा संघर्ष वेळेवर आवरता घेण्यात त्या पक्षाच्या इतर नेत्यांना यश लाभले नाही, तर पक्षाच्या ऐक्यावर निश्चित विपरीत परिणाम होईल. पक्षावरील आपले प्रभुत्व कायम ठेवायला चरणसिंग इतके अधीर झालेले आहेत की हृदयविकारासारख्या गंभीर आजाराने शरीर ग्रासले असले तरी प्रकृती बरी होईपर्यन्त थांबायचीही त्यांची तयारी नाही. अ. भा. आयुर्विज्ञान संस्थेतील डॉक्टर चरणसिंगांच्या शारीरिक अवस्थेसंबंधी चिंता व्यक्त करीत असतानाही चरणसिंगांनी पत्रके काढण्याचे काम काही स्थगित ठेवलेले नाही.

पक्षैक्यापेक्षाही आपण आपल्या हितसंबंधांना अधिक महत्त्व देतो हे चरणसिंगांनी कृतीनेच दाखवून दिले आहे. हरयानाचे मुख्यमंत्री देवीलाल यांच्याविरुद्ध काही आमदारांनी मोरारजी देसाई आणि चंद्रशेखर यांच्याकडे तक्रारी केल्यानंतर, देवीलाल यांनी आपल्या पाठीशी बहुमत आहे किंवा नाही याचा विधिमंडळ जनता पक्षाची बैठक घेऊन निवाडा करावा असे संसदीय मंडळाने ठरविले. देवीलाल यांना आपण मुख्यमंत्री केलेले असल्यामुळे, त्यांच्यासंबंधी संसदीय मंडळाने अविश्वास दाखवावा याचा चरणसिंगांना एवढा संताप आला की, त्यांनी संसदीय मंडळ आणि कार्यकारिणी यांचा राजीनामा धाडून दिला.

जनता पक्षाच्या तथाकथित त्रिमूर्तींपैकी आपण एक असल्यामुळे आपले राजिनाम्याचे पत्र मिळताच संसदीय मंडळाचे इतर सदस्य घाबरून जातील आणि राजिनामा परत घेण्याविषयी आपली अजीजी करण्यासाठी धावत आपल्याला भेटायला येतील, अशी चरणसिंगांची अटकळ होती; परंतु संसदीय मंडळाने आपल्या निर्णयाला चिकटून राहण्याचा निर्धार दाखविल्यामुळे चरणसिंगांचा राग अधिकच धारदार झाला आणि तेव्हापासून त्यांनी चंद्रशेखरविरोधी मोहिमेला वेगाने चालना देण्याचे ठरविले.

हरयानामधील बंड शमते आहे न आहे तोच उत्तरप्रदेशात त्याची लागण झाली. तेथील मुख्यमंत्री राम नरेश यादव यांनी सत्यप्रकाश मालवीय यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करताच, यादव यांच्या विरोधात असलेला गट यादव यांच्या राजिनाम्याची मागणी करू लागला. हरयानाप्रमाणे उत्तरप्रदेशातही संबंधित आमदारांनी या वादाचा निर्णय करावा असे संसदीय मंडळाने ठरविताच चरणसिंग पुन्हा अस्वस्थ झाले. या वेळी त्यांनी एक गोष्ट केली. त्यांनी स्वत: पत्रक काढले नाही. ते काम त्यांनी त्यांचे 'हनुमान' राजनारायण यांच्यावर सोपविले. चरणसिंग संसदीय मंडळाचे सदस्य आहेत. मंडळाच्या बैठकीला आजारपणामुळे ते हजर राहू शकत नसताना त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्याला बोलावण्यात आले पाहिजे होते अशी राजनारायण यांनी जाहीर तक्रार केली.

उत्तरप्रदेश जनता विधिमंडळ पक्षातील कलह तीव्र होत असताना प्रतिक्रिया व्यक्त करायला चरणसिंगांपेक्षा राजनारायण यांनी पुढाकार घ्यायला एक कारण आहे. राम नरेश यादव यांना राजनारायण यांनी मुख्यमंत्री केले आहे. यादव जेवढे राजनारायण यांच्याजवळ आहेत तेवढी जवळीक त्यांनी चरणसिंगांशी साधलेली नाही. रामसिंग यांनी मुख्य मंत्री व्हावे अशी चरणसिंगांची इच्छा होती, ती मान्य करायला राजनारायण किंवा राम नरेश यादव यांच्यापैकी कोणीच तयार होणार नव्हते. चरणसिंगांचा मान राखायचा म्हणून त्यांनी रामसिंग यांना गृहखाते दिले एवढेच. रामनरेश यादव यांच्याप्रमाणे सत्यप्रकाश मालवीयही मूळचे राजनारायण यांच्या गोटातीलच; परंतु राजनारायण यांनी यादवांना मुख्यमंत्री केल्यापासून मालवीय बिघडले आणि विधिमंडळ पक्षात यादवविरोधी गट संघटित करायला त्यांनी प्रारंभ केला. त्यांच्या या प्रयत्नाला काटशह देण्यासाठी यादव यांनी त्यांचे मंत्रिपद काढून घेतले. मालवीय आता जेवढे यादवविरोधी आहेत त्यापेक्षाही ते अधिक राजनारायणविरोधी झालेले आहेत. रामसिंग काय, रामनरेश यादव काय किंवा सत्यप्रकाश मालवीय काय, हे तिघेही भारतीय लोकदलाचेच आहेत. त्यावरून हे दिसून येते की, आपले वर्चस्व राखण्यासाठी केवळ जनता पक्षाच्या घटकांमध्येच भांडणे आहेत असे नव्हे तर घटकांमधील वेगवेगळ्या गटांपर्यंत ही रस्सीखेच पोहोचलेली आहे. अशी एकदा सत्तास्पर्धा सुरू झाली की विरोधी गटाला शक्य होईल त्या त्या मार्गाने बदनाम करण्याचा खटाटोप सुरू होतो. मालवीय यांच्याबाबतीत राजनारायण तोच प्रयोग करू पहात आहेत. बड्या जमीनदारांचा यादव यांच्या पुरोगामी कार्यक्रमाला विरोध असल्यामुळे त्यांनी यादवविरोधी बंडाला पैसा पुरविला आहे, असे राजनारायण यांनी म्हटले आहे. चरणसिंगांनीही या आरोपाला दुजोरा दिला आहे. पैसा देऊन निष्ठा विकत घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा आपल्या अनुयायांना इशारा देण्यामागचा चरणसिंगांचा हेतू स्पष्ट आहे. मालवीय यांना हाताशी धरून 'पुरोगामी' यादवांना पदच्युत करण्याचा कट आखण्यात आलेला आहे, हेच त्यांना सुचवायचे आहे.

देवीलाल आणि रामनरेश यादव यांच्याप्रमाणे बिहारचे मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर हेही चरणसिंगांच्या भारतीय लोकदलाचे आहेत. त्यामुळे कोणीही मागणी केलेली नसताना, कर्पूरी ठाकूर यांना चरणसिंगांनी विधिमंडळ जनता पक्षाची बैठक बोलावून विश्वासाचा ठराव संमत करून घेण्याचा आदेश दिला आहे. कर्पुरजींनी आपल्या नेत्याची सूचना शिरोधार्य मानून, चंद्रशेखर यांना विधिमंडळ जनता पक्षाची बैठक आयोजित करण्याचे आवाहन केले. संसदीय मंडळाने तसे सुचविलेले नसल्यामुळे, बैठक घ्यायची कर्पुरीजींची इच्छा असेल, तर त्यांनी ती स्वत: बोलवावी, संसदीय मंडळ त्या बैठकीला आपला निरीक्षकही धाडणार नाही, असे चंद्रशेखर यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे स्वत:वर विश्वासनिदर्शक ठराव संमत करून घेण्याचे कार्य कर्पुरी ठाकूर यांना पार पाडावे लागेल.

अशा रीतीने एकीकडे चंद्रशेखर यांच्यावर दबाव आणण्याचा चरणसिंगांचा प्रयत्न चालू असतानाच आपले आणि पक्षाध्यक्षांचे गंभीर वैचारिक मतभेद आहेत, हेही त्यांनी मुद्दाम जाहीर करून टाकले आहे. अवजड उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्याचे जवाहरलाल नेहरूंचे धोरण चरणसिंगांना नापसंत आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतीच्या आणि तत्समपूरक व्यवसायांच्या विका-

मलपृष्ठ १ वर

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक दोन

१० जून १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४४३४५९

¤


# अवती-भवती

शरद कृष्णन्

## ☐ नाथवानी–तारकुंडे समिती आणि दाउदी बोहरा समाज

धार्मिक सबबी पुढे करून सामाजिक बहिष्कार घालण्याचा प्रकार घटनेने दिलेल्या स्वातंत्र्य-समता या तत्त्वांना हरताळ फासणारा असल्याने हा प्रकार थांबवावा यासाठी दाउदी बोहरा समाजाच्या काही तरुण कार्यकर्त्यांनी चळवळ सुरू केली. याच अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी पुरोगामी विचाराच्या अन्य मंडळींनी ४ जून ७७ ला मुंबईच्या सुंदराबाई सभागृहामध्ये एक सभा घेतली. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, महाराष्ट्र जनता पक्षाध्यक्ष श्री. एस्. एम्. जोशी आदी मंडळींची या सभेत भाषणे झाली. दाउदी बोहरा समाजाचेच काही तरुण जयप्रकाशजी मुंबईमध्ये असताना त्यांना भेटले आणि धर्मगुरूंकडून या समाजामधील प्रत्येक व्यक्तीवर किती जाचक बंधने असतात याचा तपशील त्यांनी पुरविला. काही उदाहरणेही दिली. जे. पीं. नी दाउदी बोहरा समाजाचे धर्मगुरू सैयदानासाहेब यांना एक पत्र लिहिले. ‘ सुधारणावादी बोहरा समाजामधील तरुण आपला धार्मिक अधिकार नाकारीत नाहीत. तथापी लोकशाहीने व्यक्तीला दिलेले अधिकार त्यांनाही मिळाले पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे. त्याच दृष्टीने सामाजिक बहिष्काराची पद्धत आपण रद्द करावी असे मी सुचवितो. ’ या पत्रामुळे काही अनुकूल गोष्टी घडण्याऐवजी विरोधाची धार प्रखर झाली. जे. पीं. च्या विरुद्धही आवाज उठविला गेला. सामाजिक बहिष्काराचे हे हत्यार धर्मगुरू आपल्या मनाप्रमाणे वापरतात. एखाद्याला धर्मबहिष्कृत केले की, त्याच्या अतीव छळवादाला प्रारंभ होतो. समधर्मीयांबरोबर असलेला व्यापारउदीम तुटतो. त्याचे लग्न झाले नसल्यास त्याला स्वधर्मीय मुलगी मिळणे अशक्य होऊन बसते. इतके कशाला त्याला मृत्यू आल्यास त्याचा दफनविधीही करण्यात येत नाही !

या सामाजिक बहिष्काराच्या अंतिम अधिकाराखेरीज व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणारे अनेक अधिकार या धर्मगुरूंना आहेत आणि त्यांचा ते वापर करतात. या अनिर्बंध अधिकाराविरुद्ध पीडित मंडळींकडून वेळोवेळी आवाज उठविण्यात आले. तथापी ही छोटी–मोठी बंडखोरी दडपली गेली. १९४७ साली देश स्वतंत्र झाला. शिक्षणाचे, नवविचाराचे वारे सर्वत्र पसरले. स्वतःच्या धर्माचा एक कोश करून त्यात मश्गुल राहिलेला दाउदी बोहरा समाजही या नवविचारापासून अलिप्त राहू शकला नाही. याच पंथामधील काही पुरोगामी तरुणांना धर्मगुरूंचे जीवनाची सर्व अंगे व्यापून टाकणारे हे वर्चस्व खटकू लागले. वृत्तपत्रांतून पत्र-

व्यवहार सुरू झाले. धर्माबाहेरील पुरोगामी मंडळींचे सहकार्य घेण्यात येऊ लागले. सुधारणावाद्यांच्या वाजवी मागण्यांवर विचार करण्याऐवजी आपल्या अधिकारावर अतिक्रमण होते आहे असे समजून धर्मगुरूंनी आपल्या चेल्यांना उठविले. आधी सुधारणावादी हाताच्या बोटावर मोजण्याइतके. समाजामधील जवळजवळ सर्व मंडळी आजही धर्मगुरूंचे वर्चस्व पूर्णपणे मानतात. स्वाभाविकपणे नवविचाराच्या या तरुणांना विरोध होत राहिला. तथापी विरोधाला भीक न घालता ही मंडळीही आपल्या मागण्या पुढे रेटीत राहिली.

धर्मगुरूंचे बंधन कशा स्वरूपाचे आहे आणि त्यांच्या मागण्या नेमक्या कोणत्या स्वरूपाच्या आहेत हे पाहण्यासारखे आहे: मिसाक नावाचा एक धार्मिक विधी या समाजामध्ये रूढ आहे. मिसाक याचा अर्थ निष्ठेची शपथ. या शपथेमध्ये असा भाग आहे की, प्रत्येक बोहरा व्यक्तीचे स्वामी सैयदिनासाहेब आहेत. या शपथेचा भंग केल्यास व धर्मगुरूंनी आदेश दिल्यास त्याच्या नातागोत्याची मंडळी त्याच्याशी असलेले आपले संबंध पूर्णपणे तोडून टाकतात. अशा पापी माणसाने नग्नावस्थेत तीस वेळा हाजची यात्रा केली तरी त्याचे पाप धुतले जात नाही. एकदा शपथविधी झाला की, सैयदिनासाहेबांची मान्यता असल्याखेरीज लग्न करता येत नाही. त्यांना विचारल्याखेरीज निवडणुकीत मत देता येत नाही, उमेदवार म्हणून उभे राहता येत नाही अथवा वृत्तपत्र काढता येत नाही. व्याख्यान द्यायचे असेल, एखाद्या विषयावर चर्चा घडवून आणायची असेल तरी धर्मप्रमुखाची परवानगी आवश्यक ! आता एवढी चौफेर बंधने असल्यावर व्यक्तीचे समाजजीवन धर्मबंधनाखाली येणाऱ्या नीतिनियमांमध्ये इतके जखडले जाते की, स्वातंत्र्य, मग ते कोणत्याही प्रकारचे असो समाजामधील व्यक्तीपर्यंत पोचूच नये. इतक्या कठोर बंधनांमध्ये तरुण पिढी राहणे कठीण; हे खरे असले तरी सुधारणावाद्यांना धर्मविरोधक ठरवून त्याविरुद्ध उभे राहणारांची संख्या फारच मोठी आहे. सुधारणावादी समाजाचे वेगळेपण घालवायला निघाले आहेत, त्यांचा धर्मावर विश्वास नाही, त्यांना धडा शिकविलाच पाहिजे अशी भाषा केली जाते. सामाजिक बहिष्कार आणि अन्य बंधनांबाबत चौकशी करण्यासाठी नाथवानी तारकुंडे समिती नेमली जाताच सारा दाउदी बोहरी समाज खवळून उठला आहे. असे वातावरण निर्माण करण्यात धर्मगुरू आणि त्यांचे सहकारी यशस्वी झाले आहेत. पुण्यामुंबईमध्ये या समितीविरुद्ध प्रखर निदर्शने झाली. समितीसमोर साक्षीला येणे म्हणजे गुन्हा करण्यासारखे आहे, धर्मविरोध करण्यासारखे आहे असे वातावरण निर्माण करण्यात आले. सुधारणावादींना मारपीट करण्यात आली. त्यातही गमतीचा भाग असा की, ज्यांची सुधारणावादी म्हणून हेटाळणी करण्यात आली त्यांनीही धर्मगुरूंचे धार्मिक व अध्यात्मिक वर्चस्व पूर्णपणे मान्य केले असून धार्मिक बंधनांमध्ये राहण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या मागण्या अत्यंत माफक व रास्त आहेत, हे स्वतःच्या बुद्धीने विचार करणारा कोणीही मान्य करील. ते म्हणतात, १. मशिदीमध्ये जाण्यासाठी कोणाची परवानगी मागावी लागू नये हाच नियम दफनविधीच्या बाबतीत लागू करावा. २. धर्मगुरूंनी जबरदस्तीने एखाद्याला घटस्फोट घेणे भाग पाडू नये. ३. सहभोजन करण्याबाबत कोणत्याही प्रकारचे निर्बंध नसावेत. ४. सामाजिक बहिष्काराबाबत धमक्या देऊ नयत अथवा प्रत्यक्षपणे कोणाला बहिष्कृत करू नये. ५. धार्मिक निधींचे हिशेब ठेवण्यात यावेत व समाजाला ते सादर करण्यात यावेत. ६. धर्मबाह्य गोष्टींवर धर्मगुरूंचे नियंत्रण नसावे. या मागण्यांबाबत कडवा विरोध असणारांनी सुधारणावाद्यांना धर्मविरोधक ठरविले आहे. नाथवानी-तारकुंडे समितीचे काम चालू नये यासाठी सदस्यांना धमक्या दिल्या जातात. तथापी समितीने आपले काम चालूच ठेवले आहे. वास्तविक हा प्रश्न धार्मिक स्वरूपाचा नसल्याने स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाला त्याबाबत मतप्रदर्शन करता येईल. तथापी बोहरी समाजाचे कडवे पुरस्कर्ते हे मानण्यास तयार नाहीत. आमच्या धार्मिक बाबींमध्ये इतरांनी लक्ष घालू नये असा घोषा त्यांनी लावला असला तरी समिती काम करीत आहे. समिती शासनाने नियुक्त केलेली नाही अथवा तिच्या शिफारशींबाबत शासनावर कोणतेही बंधन नाही. असे असतानाही एवढी ओरड चालू आहे याचाच अर्थ पाणी कोठे तरी मुरते आहे. समितीच्या शिफारशींना कायदेशीर आधार नसला तरीही अगदीच स्वतःच्या कोशात गुरफटून राहिलेल्या समाजाच्या कक्षा रुंदावण्यास या समितीचा थोडाफार उपयोग जरूर होईल असे वाटते. ◻

## ◻ अंधश्रद्धांचे बळी....
## साल १९७८.... कथा त्याच

स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी, अथवा एखाद्या विशिष्ट समूहाचे हित साधण्याच्या उद्देशाने बालकांचा बळी देणे, मृत पतीबरोबर स्वतःला जाळून घेऊन सती जाणे यासारख्या गोष्टी सरसहा घडत नसल्या तरी या अंधश्रद्धांना बळी पडलेल्या व्यक्तींच्या दुर्दैवी कथा आज अठ्ठ्याहत्तर सालातही ऐकाव्या लागतात. आता सती जाता जाता बचावलेल्या या ओमवतीदेवींची सत्यकथाच पहा ना—गोष्ट अगदी ताजीच म्हणजे गेल्या महिन्यातील. पट्टी बनुरा या उत्तर प्रदेशामधील त्या खेड्याला त्या दिवशी जरा महोत्सवाचेच स्वरूप आले होते. वास्तविक मेंदूतील रक्तस्रावाने सत्तावीस वर्षांचा रणबीर अचानक वारला म्हणून गाव शोकात असायला पाहिजे होता; पण रणबीरचा मृत्यू ही घटना किरकोळ वाटावी अशी घटना त्याच्या मृत्यूतून निर्माण झाली होती. पतिनिधनाने व्यथित झालेल्या ओमवतीदेवींनी सती जाण्याचा निर्णय घोषित केला होता आणि त्यांच्या या निर्णयाने सारा गाव अवाक् झाला होता. रणबीरच्या निधनाचे दुःख मागे पडून त्याच्या विधवेने घेतलेल्या या निर्णयाने गावात खळबळ माजली होती. आश्चर्याची गोष्ट अशी की, गावातील बहुसंख्य नागरिक चोवीस वर्षांच्या त्या कोवळ्या मुलीने घेतलेल्या निर्णयाचा पाठपुरावा करीत होते. गावामधील विवाहित महिलांना जेव्हा ओमवती सती जाणार असे समजले त्या वेळी या धाडसी निर्णयाचे त्यांनी तोंडभर कौतुक केले. ओमवतीचे उदाहरण गावातील सगळ्या महिलांसमोर एक आदर्श म्हणून सतत तेवत राहील अशी पुस्तीही एका महिलेने जोडली आणि तिच्या भोवती जमलेल्या बाया-

बापड्यांनी माना डोलविल्या. गावातील अन्य मंडळी 'पुढच्या तयारीला' लागली.

रणबीर गावाच्या जवळ असलेल्या शिकोदाबाद या गावामधील महाविद्यालयात कारकून म्हणून नोकरी करीत होता. मेंदूनील रक्तस्रावामुळे बेशुद्ध पडल्याने त्याला आग्रा येथील सरोजिनी नायडू हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. दुसऱ्या दिवशी त्याचे निधन झाले. पतिनिधनाचा हा अनपेक्षित धक्का ओमवती सहन करू शकली नाही. केवळ दीड वर्षाचे कोवळे मूल मागे असूनही तिने सती जाण्याचा निर्णय घेतला. पतीचा मृतदेह घरी आणल्यावर ओमवतीने सतीचा वेष परिधान केला. ओमवतीच्या निर्णयाची गावाला खात्री पटली. मृत्यूही आपल्याला आपल्या पतीपासून दूर करू शकत नाही हेच तिला सिद्ध करून दाखवायचे होते. ७५ वर्षांपूर्वी नष्ट झालेली प्रथा मोडून एक कोवळी विधवा पतीबरोबर जळत्या चितेत निघाली होती आणि पाच हजार वस्तीचा गाव हा तमाशा पहाण्यास सिद्ध झाला होता ! ब्रिटिशांनी नष्ट केलेल्या एका रूढीचे पुनरुज्जीवन होत आहे म्हणून म्हाताऱ्याकोताऱ्यांनी समाधान व्यक्त केले. रणबीरच्या अंत्यविधीसाठी आलेल्या एका मित्राला ही गोष्ट समजल्यावर तो हादरला. त्याने तडक पोलिसस्टेशन गाठले.

उत्तर प्रदेशातील असूनही पोलिसांनी लगोलग हालचाल केली. संबंधित पोलिसअधिकारी मॅजिस्ट्रेटसह पट्टी बनुरा येथे येऊन दाखल झाला. मंडळी येऊन दाखल झाली तेव्हा चिता रचून झाली होती आणि पाच-सातशेचा जमाव गर्दी करून उभा होता. ओमवतीने सतीचा वेष परिधान केला होता आणि काही धार्मिक विधीमध्ये ती गुंतलेली होती. पोलिस आल्याचे लक्षात येताच ती तातडीने चितेवर चढली आणि तिने आपल्या मृतपतीचे डोके स्वतःच्या मांडीवर घेतले. पोलिस तातडीने पुढे झाले आणि त्यांनी तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण ओमवती काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीमध्ये नव्हती. पोलिसांनी सामर्थ्याचा वापर करून तिला जीपमध्ये बसविले. तथापी गाडीच्या चाव्याच कोणी तरी काढून घेतल्याचे लक्षात आले. ओमवतीने पोलिसांची नजर चुकविली आणि जिपमधून उडी टाकून ती पुन्हा आपल्या मूळ जागी म्हणजे पतीच्या चितेवर येऊन बसली. दरम्यान चिता पेटविण्यात आली होती आणि जळत्या चितेत उडी घेतल्याने तिच्या देहाची होरपळ होऊ लागली. जमलेला जमाव आपण एखादे पवित्र धर्मकृत्य पाहात आहोत अशा भावनेने सारा प्रकार पाहात होता. जळत्या अग्नीचे चटके बसू लागताच ओमवती ओरडू लागली आणि तिच्या नाहरसिंग नावाच्या पुतण्याने आपल्या भावाच्या मदतीने तिला जळत्या चितेतून खाली ओढली. ओमवतीची अशी समजूत झाली की ते आपला आशीर्वाद मागत आहेत. तिने त्यांना आशीर्वाद देण्यासाठी हात पुढे करताच दोघांनीही हात घट्ट पकडून तिला ओढण्यास प्रारंभ केला. त्यांचा हेतू लक्षात येताच ओमवती प्रतिकार करू लागली. तथापी तिच्या प्रतिकाराला दाद न देता त्यांनी तिला चितेवरून खाली ओढण्यात यश मिळविले. जमलेला जमाव पुतण्यांनी केलेल्या आगाऊपणाने चांगलाच बिथरला. त्यांनी पोलिसावर दगड फेकले आणि त्यांना ताबडतोब निघून जाण्यास सांगितले. पोलिसांनी अंजारून-गोंजारून पाहिले; परंतु जमाव दाद देत नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी लाठ्यांचा वापर करून जमाव पांगविला. जखमी ओमवतीदेवींवर तातडीने उपचार करण्यात आले आणि अधिक उपचारांसाठी त्यांना आग्र्याला नेण्यात आले. चितेवरून ओढून काढलेल्या या सतीची प्रकृती आता सुधारत आहे.

सती जाण्याला कायद्याने बंदी आहे आणि बंदीला धूप न घालता सती जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आत्महत्या करण्यासारखे आहे असे मानून कायदेशीर कारवाई करता येते हे माहीत असूनही सीता-सावित्रीच्या गोष्टी वाचणाऱ्या उत्तरप्रदेशामधल्या या छोट्या खेड्यामधील बहुसंख्य बायकांना ओमवतीदेवी वाचल्याचे समाधान नाही. उलट ही बाई वाचली याबद्दल तेथील बहुसंख्य बायका असमाधानी आहेत, असे नंतर केलेल्या पाहणीत आढळून आले.

## समाजकल्याणासाठी बालकाचा बळी

देवाला बळी दिल्याने आपल्याला पुत्रप्राप्ती होईल या कल्पनेने मुलांना मारल्याचे प्रकार अधूनमधून घडत असतात. मानवत-हत्याकांडाचे उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहेच; पण आता जो किस्सा नोंदणार आहे तो बस्तर जिल्ह्यामधील मुरिया जमातीसंबंधी आहे. या जमातीमध्ये मानवी बळी देण्याची प्रथा चांगल्यापैकी रूढ आहे. जमातीतल्या जमातीत हा प्रकार झाला तर त्याचा फारशी वाच्यता होत नाही; परंतु बाहेरील खेड्यांतून बालक पळवून आणून त्याला बळी देण्याचा प्रयत्न झाल्यास खळबळ उडते. असा बळी दिल्याने भूमाता संतुष्ट होते आणि भरघोस पीक हाती येते अशी या जमातीची समजूत आहे. जमातीच्या कल्याणासाठी बळी दिला जात असल्याने अर्थातच या प्रकाराबाबत जमातीकडून कमालीची गुप्तता पाळण्यात येते आणि पोलिसतपासाचा प्रयत्न झाल्यास जराही सहकार्य मिळत नाही. याबाबतीतील अगदी ताजा प्रकार मे महिन्याच्या चार तारखेला घडला. कोठापल्ली या खेड्यातील मुरिया जमातीची तीन मंडळी चेरला या दहा मैलांवरील मोठ्या गावात गेली. त्यांच्याबरोबर कोठापल्ली गावचा कोतवालही होता. दिवस बाजाराचा होता गरजेप्रमाणे त्यांनी थोडाफार माल खरेदी केला. गावी परतत असताना त्यांच्या पीकपाण्याबद्दल तसेच देवादिकांबद्दल गप्पा सुरू झाल्या. देवाला बळी दिला तर पीकपाणी चांगले येते असे त्यांपैकी एकाने कोतवालाला सांगितले. एखादे बालक हाती लागले तर बळी देण्याचा आपला इरादा असल्याचे समाजाच्या धर्मप्रमुखाशी संपर्क असलेल्या एकाने सांगितले. असा बळी देण्याजोगा मुलगा मिळाल्यास त्याला पळवून आणण्याचा आदेश आपल्याला धर्मप्रमुखाने दिल्याचेही त्याने सांगितले. बरोबर असलेल्या दोघांनी अशी संधी मिळाल्यास सहाय्य करू असे आश्वासन दिले आणि असे बोलणे चालू असतानाच संधी समोर चालून आली. या वेळेपर्यंत मंडळी गप्पा मारीत तिम्मापूर येथे आली होती आणि समोरच्या एकाकी रस्त्यावरून एक पोर आपल्या बापाचा हात धरून चालले होते. आगेमागे कोणी नव्हते. मुरिया मंडळींचे जे टोळके चालले होते त्यांच्या म्होरक्याने आपल्या सहकाऱ्यांचे लक्ष या बापलेकांकडे वेधून घेतले. सगळ्यांनी मिळून चर्चा केली. पोराच्या बापाला हे चौघे नक्की भारी होते. पोराला उचलले तरी कोणाची मदत मिळण्याची

पृष्ठ २४ वर

# महाराष्ट्र : राजकीय प्रवाहाची दिशा

वा. दा. रानडे

महाराष्ट्र विधानसभेच्या येत्या १२ जूनपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात सर्वांत महत्त्वाचा प्रश्न दोन्ही काँग्रेसपक्षाच्या संयुक्त आघाडीचे सरकार टिकणार की नाही हा आहे. काँग्रेस एकीकरणाच्या वाटाघाटी यशस्वी होणार की नाही हे त्यापूर्वीच स्पष्ट झालेले असेल. एकीकरण होवो न होवो सत्तेची गादी सोडावयाची नाही; सध्याची आघाडी चालू ठेवावयाची असाच निर्णय घेतला जाईल असे दिसते. तसे झाल्यास शरद पवारांची म्हणजेच चव्हाण गटाची भूमिका काय राहील? तत्त्वासाठी काँग्रेस आघाडीतून बाहेर पडण्याची आणि मंत्रिपद सोडण्याची भाषा शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी वापरली होती; पण तो आवेश आता ओसरला आहे. मधू लिमये यांनी दिल्लीत यशवंतराव चव्हाणांशी बोलणी केली होती. चव्हाण गटाने सत्तारूढ काँग्रेस आघाडीतून बाहेर पडावे आणि जनता व काँग्रेस यांच्या युतीचे सरकार बनावे या योजनेस चव्हाणांची त्या वेळी अनुकूलता दिसली; पण त्यासाठी आवश्यक असलेले कृतीचे ठाम पाऊल टाकण्याची त्यांची अजूनही तयारी नाही हे गेल्या काही दिवसात स्पष्ट झाले आहे. इंदिरा गांधींच्या धोरणांना ठाम विरोध करायचा तर त्यांच्या पक्षाला सत्तेत सहभागी करणे त्यात कसे बसते? ही सत्तेची सोयरीक मोडावयाचे धैर्य चव्हाण गट दाखवीत नाही तोपर्यंत त्यांचा इंदिराविरोध केवळ शाब्दिक व पोकळच म्हणावा लागेल. चव्हाण गटामागे वीस–बावीस आमदार आहेत असे सुरुवातीस म्हटले जात होते; पण सत्तारूढ आघाडीतून प्रत्यक्षात बाहेर पडण्याचा प्रसंग येईल त्या वेळी यापैकी किती टिकतील याची शंकाच आहे. चव्हाण-पवार गट तत्त्वनिष्ठेचा कितीही देखावा करीत असला तरी तो सत्तावादीच आहे. जनता पक्षाच्या पाठिंब्याने सत्तेवर येण्याइतके आपले बळ आहे की नाही याबद्दल त्यांना खात्री नाही. सत्ता आपल्याला पुन: मिळण्याची शक्यता नसेल तर सत्तेची सध्याची गादी कशाला सोडा असा विचार त्यांनी केलेला दिसतो. तेव्हा एकीकरणाच्या वाटाघाटीतून काहीही निष्पन्न होवो काँग्रेस आघाडी फुटण्याची शक्यता बरीच कमी आहे.

असे असले तरी आघाडी फुटली तर काय हा पर्याय गृहीत धरून आपली सत्तेची गादी सुरक्षित रहावी या दृष्टीने हालचाली वसंतदादा करीत आहेत. दादांनी ऐक्यवादाचा बुरखा घेतला असला तरी मनातून ते इंदिरावादीच आहेत. आघाडी फुटली तर त्यातून फक्त पवार गटाची थोडी मंडळी बाहेर पडतील. तेवढाच पाठिंबा दुसरीकडून मिळविला तर मंत्रिमंडळ टिकविता येईल असे त्यांचे गणित आहे. ही दुसरी मंडळी म्हणजे जनतापक्ष आणि शेकापक्ष यांच्यातले काही सभासद फोडता येतील असे त्यांना वाटते व त्या दिशेने त्यांचे प्रयत्न चालू आहेत. जनता पक्षाच्या काही सभासदांनी आपल्या मंत्रिमंडळास पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली आहे असे वसंतदादांनी काही दिवसांपूर्वी सांगितले. जनता पक्षाचे नेते उत्तमराव पाटील यांनी लागलीच त्याचा इन्कार केला व 'कोण जनता आमदार तुम्हाला पाठिंबा देणार आहेत त्यांची नावे जाहीर करा' असे आव्हान दिले. प्रतिपक्षात गोंधळ निर्माण करण्यासाठी वावड्या उठविण्याचे राजकारण चालते त्यातलाच हा एक भाग. शे. का. पक्षाचे काही सभासद काँग्रेसशी सहकार्यास तयार आहेत ही अशीच एक वावडी. शेकापक्षाचे नेते अण्णासाहेब गव्हाणे यांनी त्याचा इन्कार केला. ठाणे येथे भरलेल्या पक्षाच्या बैठकीत पक्षाने जनता किंवा काँग्रेस यापैकी कोणत्याच पक्षाशी सहकार्य न करता स्वतंत्रपणे कार्य करावे असा निर्णय घेण्यात आला. त्यात कोणताही बदल झालेला नाही असे त्यांनी सांगितले; पण जनतापक्ष व शे. का. पक्षात सारेच सभासद तत्त्वनिष्ठ नसून काही संधिसाधूंचा भरणा आहे ते फुटणार नाहीत व काँग्रेसच्या आमिषांना बळी पडणार नाहीत अशी दक्षता या दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी घ्यायला हवी.

शे. का. पक्षाने पक्षाच्या स्थापनेपासून नेहमी काँग्रेसविरोधाची आणि डाव्या गटांशी सहकार्याचीच भूमिका घेतलेली आहे. शंकरराव मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ नेते काँग्रेसला मिळाले तरी पक्ष टिकून राहिला; पण महाराष्ट्रात इतर डाव्या पक्षांप्रमाणेच त्याचेही बळ घटले कोल्हापूर, मराठवाड्यातील काही जिल्हे विदर्भातील एक-दोन जिल्हे ही या पक्षाची केंद्रे. तेथे त्याचे बळ सर्वसाधारणपणे टिकून राहिले; पण पक्ष वाढला नाही, या त्यांच्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत.

जनता आणि काँग्रेस यापैकी कोणत्याच पक्षाशी सहकार्य न करता स्वतंत्रपणे कार्य करावयाचे हा शे. का. पक्षाचा निर्णय कितपत योग्य आहे? महाराष्ट्रात स्थिर मंत्रिमंडळ बनविण्याइतके सध्या कोणत्याच पक्षाचे बळ नाही. तेव्हा विधानसभा बरखास्त करून नवीन निवडणुका घ्याव्या अशी पक्षाची भूमिका असल्याचे गव्हाणे यांनी सांगितले; पण फेरनिवडणुका घेण्याचा प्रश्न केव्हा उपस्थित होतो? बहुमत गमावल्याने सध्याचे काँग्रेस आघाडीचे मंत्रिमंडळ गडगडले आणि दुसरा कोणताही पक्ष किंवा आघाडी मंत्रिमंडळ बनवू शकली नाही तर शे. का. पक्षास फेरनिवडणुकाच हव्या असतील तर प्रथम सध्याचे मंत्रिमंडळ गडगडले पाहिजे. हे घडवून आणण्यासाठी शे. का. पक्षाने जनता व मित्र पक्षांशी सहकार्य करायला हवे. म्हणजेच जनता पक्षाशी सहकार्य करायचे नाही ही भूमिका सोडायला हवी. या प्रयत्नांना यश येऊन काँग्रेस आघाडीचे मंत्रिमंडळ गडगडले तर शे. का. पक्षाची भूमिका काय राहील? दुसरे पर्यायी मंत्रिमंडळ बनविण्यास त्या पक्षाने सहकार्य करायला हवे. या मंत्रिमंडळास कारभार करण्यास संधी द्यावयास हवी. या मंत्रिमंडळाने जनतेच्या अपेक्षा पुऱ्या केल्या नाहीत, समाधानकारक कारभार केला नाही तर शे. का. पक्षाने त्याचा पाठिंबा काढून घेणे समर्थनीय ठरेल; पण मंत्रिमंडळ बनविण्यास सहकार्य नाकारणे योग्य ठरणार नाही.

मंत्रिमंडळ बनावाबावत जनता पक्षाची भूमिका काय हवी? वसंतदादा मुख्यमंत्री नकोत, दुसऱ्या कोणा काँग्रेसनेत्याने मंत्रिमंडळ बनविले तर जनता पक्ष त्यास पाठिंबा देईल असे उत्तमरावांनी सूचित केले आहे; पण जनता पक्ष सर्वांत मोठा असताना अशी दुय्यम भूमिका त्याने कशासाठी घ्यावयाची? काँग्रेस पक्षाची जनता विरोधाची भूमिका कायम असता त्याच्या सहकार्याची अपेक्षा जनता पक्षाने का बाळगावयाची? काँग्रेस आघाडीचे सरकार पाडण्याच्या आणि आपले सरकार बनविण्याच्या या हालचालींपुढे पक्षाचे इतर सारे कार्य थंडावल्यासारखेच झाले आहे. जनतेचे निकडीचे प्रश्न सोडविण्याच्या कार्यावर कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्यातूनच पक्षाचे बळ वाढेल. दलितांचे प्रश्न, जमीनसुधारणांची अंमलबजावणी यासारख्या प्रश्नांना पक्षाच्या कार्यक्रमात अग्रस्थान मिळायला हवे. जनता पक्ष म्हणजे काँग्रेसप्रमाणे केवळ निवडणुकीच्या आणि सत्तेच्या राजकारणात गुरफटलेला पक्ष बनता कामा नये. निष्ठावंत कार्यकर्त्यांचा पक्ष बनण्यावरच त्याचे भवितव्य ठरणार आहे. □

## मुक्ताफळे

# □ धीरेंद्र कडके यांची मुलाखत

रेड्डी काँग्रेसचे कार्यकर्ते धीरेंद्र कडके आणि इंदिरा काँग्रेसच्या नेत्या कु. आशा आणीबाणीकर यांचा विवाह होणार ही बातमी वार्ताहरांना कळल्यापासून त्यांना दुसरे काही सुचत नव्हते. अमेरिका न्यूट्रॉन बाँब करणार यात त्यांना रस नव्हता, इटलीच्या माजी पंतप्रधानांना मार्क्सवाद्यांनी का ठार मारले याच्या चौकशीत त्यांना अर्थ वाटत नव्हता. त्यांना एकच प्रश्न होता. धीरेंद्र कडके यांचा कु. आशा आणीबाणीकर हिच्याशी म्होतूर लागणार की नाही? लागणार असला तर कधी लागणार? लागणार नसला तर का लागणार नाही? असे झाले तर धीरेंद्र कडके कुणाशी पाट लावतील? सर्व पत्रकारांची धावपळ उडाली होती. शेवटी धीरेंद्र कडके यांनी पत्रकार परिषद घेण्याचे मान्य केले व त्या वेळी कु. आशा आणीबाणीकर हजर रहातील असे आश्वासन दिले तेव्हा चौकस आणि भंकस पत्रकारांचा जीव भांड्यात पडला. या वेळी प्रश्नोत्तरे झक्क झाली—

प्रश्न : आपण कु. आशा आणीबाणीकर यांच्या प्रियाराधनासाठी तीन आठवड्यांची मुदत मागितली होती ती तर आता संपली.

धीरेंद्र कडके : मुदत संपली असली तरी ती वाढविणे शक्य आहे. (इथे आशाबाई लाजल्या.)

प्रश्न : आपले रूप चांगले नाही. खिशात दिडकी नाही. मुलीकडल्या लोकांना आपले स्थळ पसंत नाही. असे असताना आपल्या वडिलांना आपला हा लोचटपणा मान्य आहे काय?

धीरेंद्र कडके : मी वडिलांचा मुलगा म्हणून हे प्रयत्न करीत नसून— व्यक्तिगत प्रयत्न करीत आहे.

प्रश्न : तुमच्या वडिलांनी आपण धीराने प्रयत्न करीत आहात असे म्हटले आहे. याबद्दल तुम्हाला काय सांगायचे आहे?

धीरेंद्र कडके : यावर मला काही एक बोलायचे नाही.

प्रश्न : हा प्रश्न आशाबाईंना आहे. आपले लग्न होणार की विवाह? पाट लावणार की म्होतूर? मॅरेज होणार की वेडिंग?

कु. आशा आणीबाणीकर : इश्श! मला यात काहीच फरक दिसत नाही. लग्न झाले की विवाह होतोच. पाट लावला की म्होतूर होऊ शकतो. मॅरेज आणि वेडिंग यातला फरक सूक्ष्म आहे. मॅरेज हे विलनीकरण असते तर वेडिंग म्हणजे ऐक्य नसते.

प्रश्न : ठीक आहे. पण आपले हे लग्न कुठल्या पातळीवर होणार?

धीरेंद्र कडके : पातळांचा काय प्रश्न आहे? एका पातळानिशी ती विवाह करील...

पडसाद : आपण बहिरे आहात का? प्रश्न पातळासंबंधी नाही. पातळी—पातळीसंबंधी आहे. आशाबाई, तुमचे लग्न कुठल्या पातळीवर होणार?

आशा आणीबाणीकर : लग्न होईल की नाही ते मला माहीत नाही. झालेच तर ते गावपातळीवर होऊ शकेल, जिल्हा-पातळीवर होऊ शकेल. माझी पातळी ठरलेली आहे. धीरेंद्रला पातळी आहे असे मला वाटत नाही.

धीरेंद्र कडके : ही काय बोलली हे मला ऐकू आले नाही. लग्नानंतर ती असे बोलणार नाही अशी मला आशा आहे. वसंत ऋतूतच फक्त कोकिळा गाते. नंतर एकदा अंडी घालू लागली की ती गप्प असते.

(इथे आशा आणीबाणीकरने उठून धीरेंद्रच्या खाडकन् मुस्कुटात मारली. पत्रकारही पळू लागले; पण आणीबाणीकर आणि धीरेंद्र यांच्यात लगेच समझोता झाला व मुलाखत पुढे सुरू झाली.)

प्रश्न : लग्न झाल्यावर आपली बायको सत्तेमुळे आंधळी होऊन हुकुमशहा होईल असे नाही आपल्याला वाटत? तिचे आत्ताचे वर्तन—

धीरेंद्र कडके : हा पुढचा प्रश्न आहे. शिवाय मी बहिरा आहेच. बायको आंधळी झाली तर विवाह सुखाचा होईल — A good marriage would be between a blind wife & a deaf husband.

प्रश्न : आपण सध्याही अधूनमधून एकत्र येता. हिल स्टेशनवर जाऊन रहाता. विवाह झाला नाही तर या आपल्या चाळ्यांवर काही परिणाम होईल का?

धीरेंद्र कडके : काहीएक परिणाम होणार नाही. हिल स्टेशनवर खोली घ्यायला माझ्याजवळ पैसा नाही हे आपण जाणताच, पैसा तिच्यापाशी आहे. ती मला बोलाविते.

प्रश्न : पण आपण लग्नाशिवाय एकत्र येणे थोपवायचे आहे असे नाही आपणाला वाटत?

धीरेंद्र कडके : यासाठी आचारसंहिता आवश्यक असून ती तयार होत आहे.

प्रश्न : आणीबाणीकर, तुम्हाला आचारसंहिता मान्य आहे काय?

कु. आशा आणीबाणीकर : आचारसंहितेची गरज नाही! मला कडक्यापासून कसलाही धोका वाटत नाही. मी खंबीर आहे!

प्रश्न : धीरेंद्र, आता शेवटचा प्रश्न. आपल्या मताने, कु. आशा आणीबाणीकर यांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग शिखरासारखे आहे. या शिखरावर आपण पोचाल असे आम्हाला वाटत नाही. तुम्ही बिनलग्नाचे राहणार काय?

धीरेंद्र कडके : आमचा रस्ता अवघड, लांब व एकाकी आहे. विचारांची साथ घेऊन खंबीरपणे मी शिखर चढणार आहे, प्रियारायधन सुरू असताना मी खुराकाने आणि अंगमेहनतीने माझे शरीर बळकट करून माझे व्यक्तिमत्त्व सुधारण्याचा प्रयत्न करणार आहे.

(कु. आशा आणीबाणीकर इथे गालातल्या गालात हसू लागतात.)

प्रश्न : कु. आणीबाणीकर, तुम्ही का हसत आहात?

कु. आशा आणीबाणीकर : मी बहिरी नसल्याने मला हसू येते आहे. म्हातारचळ लागला की माणूस असे बडबडतो म्हणून मला हसू आले.

प्रश्न : याचा अर्थ तुमच्या मैत्रीचा शेवट होणार काय?

कु. आशा आणीबाणीवर : नाही. तुमची मैत्री ही तुमच्या गरजांची पूर्ती असते. मैत्री हे शेत असते. एकाने प्रेमाची पेरणी करावी. दुसऱ्याने कापणी! म्हातारचळ लागलेला मित्रही उपयुक्त असतोच. □

ही काही महाराष्ट्रातल्या दादांच्या संयुक्त मंत्रिमंडळाची आणखी एक कुंडली मांडलेली नाही; पण आजवर हे मंत्रिमंडळ का टिकून राहिले व कोसळले तर त्यामागील कारणांची गुंतागुंत कशी राहील याची चर्चा हा या लेखाचा विषय आहे.

# चक्रव्यूहात अडकलेले दादामंत्रिमंडळ

## माहितगार

दोन्ही काँग्रेसचे विलिनीकरण करण्याचा प्रयोग महाराष्ट्रात करून पहावा या अर्थाची विधाने श्रीमती इंदिरा गांधी यांनी कर्नाटकमधील नंदीहिल्स येथे २७ मे १९७८ रोजी केली आहेत गोफणीतून मारलेला दगड भिरभिरत येऊन लागावा त्याप्रमाणे इंदिरा गांधींचे हे निवेदन महाराष्ट्रातील एकीकरणवाद्यांना लागले आहे. गोफणीचा दगड लागल्यावर माणसाला भोवळ येते, अंधेरून येते व नेमके आपल्याला काय होते आहे, कोठे आहोत हे समजत नाही. तशीच अवस्था महाराष्ट्रातील एकीकरणवादी मातब्बरांची झाली आहे. मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांनी 'गांधींच्या निवेदनाचा अर्थ आपल्याला समजत नाही, समजलेला नाही' असे सांगून गांधींनी आपल्याला अडचणीत टाकले आहे अशी कबुलीच दिली आहे.

गांधींनी महाराष्ट्रातील एकीकरणवाद्यांना अडचणीतच टाकले आहे असे नव्हे तर एकीकरणाकरता पर्यायामागून पर्याय देणाऱ्यांना सणसणून चपराकही मारली आहे. मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांनी काँग्रेसच्या एकीकरणाकरिता फुटीपूर्वीच्या काँग्रेसच्या महासमितीचे अधिवेशन भरवावे असा पर्याय सुचविला होता. या पर्यायाचा उल्लेख करून श्रीमती गांधी, 'फुटीपूर्वीच्या महासमितीचे अधिवेशन ही काय चीज आहे ? हेच अधिवेशन आता भरवायचे तर त्यावेळी मागणी केली असताही सामुदायिक नेतृत्वाची भाषा करणारांनी का नाकारली ?' अशी विचारणा केली आहे. तडजोड करावी म्हणून वसंतरावदादांनी हा पर्याय सुचविला होता. हा पर्यायच धुडकावून गांधींनी तडजोड नाकारली आहे व एकीकरण नव्हे आमच्यात विलीन व्हावयाचे असेल तर व्हा असे बजावले आहे. दादांना गांधींच्या विधानांचा अर्थ चांगलाच समजला आहे म्हणूनच ते म्हणाले, 'गांधींच्या या अशा विधानांनी भांडणे वाढत जातात !' आपल्या शर्तीवर तडजोड, आपण म्हणू ते इतरांनी मान्य केले पाहिजे, तडजोडीसाठी देवाण–घेवाणीचे तत्त्व स्वीकारावयाचे नाही, पूर्वीच्या घटना विसरायच्या नाहीत व आपल्याच मताने कारभार चालवायचा ही गांधींची प्रवृत्ती जराही कमी झालेली नाही हेच नंदीहिल येथील त्यांच्या निवेदनाने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

**महाराष्ट्रात विलिनीकरणाचा प्रयोग करून पहावा असे गांधींनी म्हटले आहे. काय होतो याचा अर्थ ?**

गांधी यांना आपल्या हातात काँग्रेस संघटना ठेवायची आहे. जनता सरकार गांधींच्या विरोधात जी कारवाई करील तिला प्रतिकार करण्यासाठी किंवा प्रतिकाराचा दबाव निर्माण करून सरकारची कारवाई टाळण्यासाठी त्यांना संघटनेचा वापर करून घ्यावयाचा आहे, हे श्रीमती गांधींनी काँग्रेस फुटीपूर्वी अनेक शब्दांत जाहीर केले आहे. मध्यस्थी करण्यास गेलेल्या वसंतराव पाटील यांच्यासारख्या मध्यस्थांना गांधींनी हे स्पष्टही केले होते. आपल्या विरुद्धची कारवाई ही संघटनेच्या अध्यक्षावर केलेली कारवाई आहे असे स्वरूप आणून आपल्या वैयक्तिक कारणाकरता त्यांना संघटनेचा उपयोग करून घ्यावयाचा आहे. संघटना आपल्या हातात असल्याशिवाय संघटनेचा या कामासाठी उपयोग करून घेता येणार नाही म्हणून गांधींना आपल्या वर्चस्वाखाली असलेली संघटना हवी आहे. काँग्रेस संघटना आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न यशस्वी होत नाही हे दिसून आल्यावर त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली चालणारी–वावरणारी संघटना १ जानेवारी १९७८ रोजी स्थापली.

श्रीमती गांधींना आपल्या राजकारणासाठी, आपल्या प्रभुत्वाखाली राहणारी संघटना नेहमीच हवी होती. ती ठेवण्यासाठी त्यांनी प्रथम १९६९ साली व नंतर १९७८ साली काँग्रेस फोडली. यापूर्वी १९६३ साली, नेहरूंच्या हयातीमध्ये श्रीमती गांधींनी आपल्या राजकारणाकरिता काँग्रेसमध्ये फूट पाडून 'न्यू काँग्रेस ऑफ इंडिया' या नावाचा नवा पक्ष काढण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या हातात पक्षाची सूत्रे येत नाहीत, असे दिसू लागते तेव्हा गांधी पक्षात फूट पाडून नव्या पक्षाची स्थापना करण्याच्या प्रयत्नाला लागतात. १९६३ चा नव्या पक्षाचा प्रयत्न किंवा १९६९ व १९७८ ची काँग्रेसची फूट गांधींनी पक्ष आपल्या हातात ठेवण्यासाठी पाडली आहे.

श्रीमती गांधी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापलेल्या काँग्रेस पक्षाचा कार्यक्रम तरी कोणता आहे ? गांधींविरुद्ध सरकारने कारवाई केली तर त्याचा प्रतिकार कसा करावयाचा हे इंदिरा गांधी यांची काँग्रेस ठरवीत आहे. या प्रतिकाराच्या कार्यक्रमाशिवाय काँग्रेस आय. दुसऱ्या कशावर भर देत आहे असे दिसून येत नाही. पक्षाचे राजकारण आपल्याभोवती फिरत ठेवण्याची त्यांची प्रवृत्ती कायम आहे, त्यांना याकरिता पक्ष आपली मिरासदारी बनवायची होती.

ही मिरासदारी करण्यास विरोध असणारांनी सामुदायिक नेतृत्व व अंतर्गत लोकशाहीच्या तत्त्वाचा उच्चार केला. सामुदायिक नेतृत्व, लोकशाही या तत्त्वांवरील अढळ निष्ठेपायी, श्रद्धेपायी या लोकांनी त्याचा स्वीकार केला असेही समजण्याचे कारण नाही. इंदिरा गांधी पक्षसंघटनेत राहिल्या तर त्यांची पक्षावर पकड राहून आपण बाजूला फेकले जाऊ, ही भीती कायम असणाऱ्यांनी गांधींच्या हातात पक्ष जाऊ नये म्हणून सामुदायिक नेतृत्व, अतर्गत लोकशाही यांची कास धरली आहे. ही कास धरली, की आपोआपच गांधींचे प्राबल्य कमी होईल व आपल्याला त्यांचा धोका राहणार नाही असा हिशोब करून त्यांनी सध्या गांधीविरोधी भूमिका घेतली आहे. सामुदायिक नेतृत्वाच्या बाजूला गेलेली मंडळीसुद्धा आपल्या वैयक्तिक राजकारणाचा विचार करूनच एक झाली असली तरी त्यांच्या भूमिकेमुळे एकाधिकारशाहीला रोखण्याचा प्रयत्न होत आहे. व्यक्तीच्या एकाधिकारशाहीचे अनेक प्रकारे तोटे व धोके असल्यामुळे एकाधिकारशाहीविरुद्ध उभ्या राहणाऱ्या मंडळींच्या बाजूने पाठिंबा निर्माण करणे हिताचे होणार आहे.

## मुळावर घाव घातला

एकाधिकारशाहीच्या विरोधात यशवंतराव चव्हाण, स्वर्णसिंग, करणसिंग प्रभृती नेते उभे ठाकले आहेत. या नेत्यांच्या राजकीय पायाचा व प्रतिमेचा विचार केला तरच महाराष्ट्रात दोन्ही काँग्रेसच्या विलिनीकरणाचा प्रयोग करून पाहावा असे गांधी का म्हणतात ते स्पष्ट होईल. करणसिंग यांचा गांधींच्या एकाधिकारशाहीला विरोध आहे; परंतु त्यांचा सामान्य माणसाशी किती संपर्क आहे? काश्मीरच्या सामान्य जनतेचाही त्यांना पाठिंबा नाही किंवा काश्मीरच्या सामान्य जनतेचे ते खऱ्या अर्थाने प्रतिनिधी होऊ शकत नाहीत. राजघराण्यातील व्यक्तीचे राजकारण हौशी समाजकारण करणाऱ्या माणसासारखेच असते! करणसिंग यांचे नेतृत्व देशातील सामान्य माणसाच्या मनाचा ठाव घेणारे नाही. स्वर्णसिंग यांच्या बाबतीत थोड्याफार फरकाने हाच अनुभव आहे. बरीच वर्षे केंद्रीय मंत्रिमंडळात असल्यामुळे त्यांचे नाव असले तरी पंजाबचे नेते म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जात नाही. राहता राहिले यशवंतराव चव्हाण! दोन्ही काँग्रेसच्या नेत्यांकडे किंवा फुटीपूर्वीच्या एकाच काँग्रेसकडे नजर टाकली तर इंदिरा गांधी यांच्यानंतर यशवंतराव चव्हाण हेच गांधींच्या खालोखाल अखिल भारतीय पातळीचा नेता म्हणून ओळखले जातात. अशा नेत्याने इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध उभे राहण्याचे ठरविले आहे. यशवंतरावांजवळ अ. भा. नेतेपदासाठी आवश्यक अशी क्षमता आहे; पण ठाम भूमिका घ्यावयाची नाही, खंबीरपणे निर्णय न घेता कुंपणावर बसून राजकारण करावयाचे या त्यांच्या नीतीमुळे लोकांना, कार्यकर्त्यांना यशवंतरावांविषयी भरवसा वाटत नाही; परंतु आज त्यांनी गांधीविरोधी ठाम भूमिका घेतली आहे. त्यातही स्वतःच्या बचावाच्या राजकारणाचा भाग आहे हे मान्य करूनही ते एका धोकादायक प्रवृत्तीच्या विरुद्ध उभे आहेत हेही लक्षात घेतले पाहिजे. स्वतःच्याच राजकारणाचा यशवंतरावांनी आजवर विचार केला. तोच धागा त्यांचा गांधीविरोधी भूमिकेतही कायम आहे. मात्र वर म्हटल्याप्रमाणे एका वाईट प्रवृत्तीविरुद्ध ते उभे असल्याने बाकीचा विचार बाजूला ठेवून त्यांच्या भूमिकेकडे पाहिले पाहिजे.

मात्र यशवंतरावांच्या भूमिकेत थोडा बदलही झाला आहे. अगदीच पूर्वीची त्यांची वृत्ती राहिलेली नाही. आजवर यशवंतरावांनी स्वतःच्या राजकारणासाठी वाईट प्रवृत्ती दिसत असल्या तरी त्याविरुद्ध आवाज उठविला नव्हता. आता ते स्वतःच्या राजकारणाचाच विचार करून उभे राहिले आहेत; पण या वेळी स्वतःच्या राजकारणाचा विचार करीत असताना त्यांनी वाईट, अपप्रवृत्तीविरुद्धही भूमिका घेतली आहे, हा तो बदल आहे! आपल्याला विरोध करण्याचा पवित्रा अ. भा. स्थान असलेल्या यशवंतरावांनी घेतला आहे. अशा वेळी त्यांना स्थान असलेल्या राज्यातच दोन्ही काँग्रेसचे विलिनीकरण घडवून आणले तर आपल्या विरोधाचा देशव्यापी प्रयत्न कोसळून पडेल असे श्रीमती गांधींना वाटते. **म्हणून श्रीमती गांधी दोन्ही काँग्रेसच्या विलिनीकरणाचा पाया महाराष्ट्रात घालू पाहात आहेत.** तसे घडल्यास यशवंतराव चव्हाणांच्या प्रयत्नांना खीळ बसणार आहे. स्वतःचे राज्य त्यांना वाचविता आले नाही, आपल्याबरोबर ठेवता आले नाही. ते देशाच्या पातळीवर विरोधाची धार कायम ठेवू शकत नाहीत अशी यशवंतरावांची प्रतिमा गांधींना निर्माण करावयाची आहे. फुटीपूर्वीच्या महासमितीचे अधिवेशन भरविण्याचा पर्याय स्वीकारला तर आपण तडजोडीला तयार झालो असा त्याचा अर्थ होणार आहे, असे समजून गांधींनी दादांच्या पर्यायाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत.

या साऱ्याच प्रकाराने दादा गोंधळून गेले आहेत. अनेकांच्या विरोधात जाऊन दादा एकीकरणाचे प्रयत्न करीत असताना गांधींनी त्यांना अशी वागणूक देणे हा लाथाडण्याचाच प्रकार आहे; पण चक्रव्यूहात शिरलेल्या अभिमन्यूसारखी अवस्था दादांची झाली आहे. आपल्याला राजकीय अपयश आले आहे हे झाकण्याचा दादा-प्रभृतींचा प्रयत्न मात्र चालूच आहे.

महाराष्ट्रात गांधीविरोधकांचा फज्जा उडविला की श्रीमती गांधी आपले लक्ष केरळवर केन्द्रित करतील; तरी पण गांधी विरोधाचे अ. भा. पातळीवरील विरोधाचे सर्वांत मोठे केन्द्र महाराष्ट्र आहे. याचे कारण एवढेच आहे की, गांधी विरोधाची भूमिका घेतलेले गांधींच्या खालोखालचे काँग्रेसचे नेतृत्व महाराष्ट्रातून आलेले आहे. याच मुळावर घाव घातला की, आपल्या विरुद्धचा साराच वृक्ष उन्मळेल असे गांधींना वाटते. म्हणून त्यांनी महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित केले आहे. थोडक्यात काँग्रेसच्या एकीकरणाचे भवितव्य महाराष्ट्राच्या भूमिकेवर अवलंबून आहे.

## संयुक्त मंत्रिमंडळ अधिकारशाही!

महाराष्ट्रातच दोन्ही काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ आहे. या सरकारामुळेसुद्धा एकीकरणाच्या विचाराला चालना मिळाली आहे. इंदिरा काँग्रेसला अपेक्षेपेक्षा यश मिळाले त्यामुळे तीच सत्तेचा सोपान आहे असे वाटून अनेक जण काँग्रेस आय.च्या दारावर धडकू लागले. सत्तेचा सोस असलेले व नाराज झालेले भराभर काँग्रेस सोडू लागले. त्यामुळे वसंतराव पाटील यांच्यासारखे नेतेही काँग्रेस

आय.चा विचार करू लागले. काँग्रेस (आय)चा उंबरा ओलांडण्याऐवजी काँग्रेसचेच एकीकरण घडवून आणले तर या सर्वच काँग्रेसचे महाराष्ट्रातील नेतृत्व आपल्याकडे घ्यायचे व त्या जोरावर महाराष्ट्राचे नेते म्हणून राज्यातील सारी सत्ता आपल्या हातात ठेवायची हा दादांचा हेतू आहे. संयुक्त मंत्रिमंडळ टिकले तरच एकीकरणाचा हा विचार काँग्रेस कार्यकर्त्यांना भुरळ घालणार आहे. याकरिता सरकार टिकविण्याची कसरत दादा करीत आहेत. ही कसरत करताना दादांना किरकोळ गोष्टीसाठीही काँग्रेस (आय)चे मंत्री अडवीत आहेत, हे आता गुपित राहिलेले नाही.

**एका एस. टी. स्टँडच्या उद्घाटनाचा समारंभ मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांच्या हस्ते करण्याचा कार्यक्रम ठरला. वाहतूकखात्याचे मंत्री बाबुराव काळे यांची संमती घेण्यापूर्वी दादांचा कार्यक्रम ठरविला म्हणून काळे यांनी त्याला विरोध केला. या कार्यक्रमावर काळे यांनी बहिष्कार घातला होता.**

दादांची अशा प्रकारे कोंडी केली जात असताही दादा एकीकरणाचा प्रयत्न करीत आहेत. आज शरणागत व्हावे लागले तरी चालेल; पण एकीकरणानंतरच्या काँग्रेसचे नेतृत्व आपल्याकडेच चालून येणार आहे हा हिशोब दादा मांडीत बसले आहेत. दादा व त्यांच्या पत्नी सौ. शालिनीताई दोघे मिळून महाराष्ट्राचे राजकारण खेळत आहेत. महाराष्ट्रात एकीकरण करून देशाच्या पातळीवरून यशवंतराव चव्हाण यांचे उच्चाटन करण्याचे गांधींचे राजकारण चालले आहे तर एकीकरण करून महाराष्ट्राचे एकमेव नेते होण्याची स्वप्ने दादा पाहात आहेत.

एकीकरणामुळे गांधींच्या एकाधिकारशाहीचे पुनरुज्जीवन होणार आहे. हा धोका गंभीर आहे. राजकारण्यांच्या स्वार्थी राजकारणामुळे हे घडत आहे. संयुक्त सरकार हीच एकीकरणाच्या प्रयत्नांना चालना देणारी व पर्यायाने एकाधिकारशाही वाढविणारी किल्ली आहे. म्हणून एकीकरणातून फोफावणाऱ्या अपप्रवृत्ती विचारात घेता हे संयुक्त सरकार बदलणे केव्हाही हिताचे होणार आहे; पण सरकार कसे बदलले जाणार हा प्रश्नच आहे. जनता पक्षाचे सरकार स्थापन होऊ शकलेले नाही. तरी पण यापुढे शहाणपणाचे राजकारण केले तर संयुक्त काँग्रेसचे सरकार बदलण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ शकतीलही. १०-१५ आमदारांनी पाठिंबा काढून घेण्याचे ठरविले तर सरकार अजूनही पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळू शकेल. जनता पक्षाचे सरचिटणीस मधू लिमये यांनी या प्रयत्नाची त्याच दृष्टीने चाचपणी करण्यास सुरुवात केली व यशवंतराव चव्हाण यांच्याशी बोलणी केली. हे प्रयत्न यशस्वी होऊन उद्योगमंत्री शरद पवार यांच्याबरोबर असलेल्या १०-१५ आमदारांनी संयुक्त सरकारचा पाठिंबा काढून घेतला असता तर काँग्रेसच्या संयुक्त मंत्रिमंडळाचा कारभार संपणार होता. शरद पवार यांना मुख्यमंत्री करावे किंवा त्यांच्या पाठिंब्याने 'जनता सरकार स्थापावे किंवा पवारगट व जनता यांचे संयुक्त सरकार आणावे असे पर्याय चव्हाण-लिमये यांच्या बोलण्यातून पुढे येऊ शकले असते. यापैकी काहीच घडले नाही व संयुक्त सरकार टिकून राहिले.

शरद पवार व काही आमदार यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाला मानणारे असल्यामुळे पवारगटाविरुद्ध इंदिरा काँग्रेस आपले डावपेच आता खेळू लागली आहे. पवार गटाचे १०-१५ आमदार बाजूला गेले तर सरकार कोसळू नये यासाठी जनतामधील ३-४ व शे. का. पक्षातील ३-४ आमदारांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांनी सुरू केला. सध्या १५४ जणांचा सत्तारूढ पक्षाला पाठिंबा आहे. त्यातून पवार यांच्या बाजूला असलेले पंधरा आमदार गेले तर १३९ जण राहतात. म्हणजे बहुमतासाठी सहा जण कमी पडतात. या सहा जणांचा पाठिंबा जनता व शे. का. पक्षातून येणाऱ्यांच्यामार्फत भरून काढण्याची व्यवस्था दादा करीत आहेत. ही व्यवस्था होत आहे हे पाहूनच उपमुख्यमंत्री नाशिकराव तिरपुडे यांनी शरद पवार यांना मंत्रिमंडळातून काढावे अशी मागणी केली आहे. तिरपुडे यांच्या मागणीला काँग्रेस आयच्या आणखी एका मंत्र्याने पाठिंबा दिला आहे व त्यानेही दादांना शरद पवार यांना वगळण्याचा सल्ला दिला. 'पवार यांना वगळणे आपल्याला सध्या तरी अवघड आहे' असे दादांनी तिरपुडे यांना सांगितले; परंतु तिरपुडे व त्यांच्या सहकाऱ्याने शरद पवारांना काढणे अवघड वाटत असेल तर त्यांच्याकडून उद्योगखाते तरी काढून घ्या व अगदी किरकोळ खाते द्या म्हणजे पवार हा आपला अपमान मानून मंत्रिपदाचाच राजीनामा देतील असा सल्ला दिला. दादांची त्यालाही अजून तयारी झालेली नाही, 'हा प्रकार करूनच पाहा' असे पवार यांच्या गटाचे म्हणणे आहे.

## दुभंगलेली चव्हाण काँग्रेस

एकीकरणासंबंधी चालविलेल्या प्रयत्नाला महाराष्ट्रातील राजकारणामुळे यश येत नाही असे दिसून आल्यानंतर दादा कदाचित पवार यांना वगळण्याच्या मार्गाचा अवलंब करतीलही. दादा व तिडके यांना आज चव्हाण गटापेक्षा काँग्रेस आय अधिक जवळची वाटू लागली आहे. यशवंतराव चव्हाण ३० मे रोजी मुंबईत आले असता दादा स्वागतालासुद्धा हजर नव्हते! यशवंतरावांच्या स्वागतास दादांची अनुपस्थिती अलीकडच्या काळातील पहिलीच आहे! पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारलेल्या नेत्याविषयीची मुख्यमंत्र्यांची ही भावना आणि प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षांना तर आपल्या सरचिटणिसांविषयीच संशय! अशा अवस्थेत पक्ष एक आहे या म्हणण्याला तरी काय अर्थ राहतो?

दिल्ली–काँग्रेस मेळाव्यात १५ व १६ मे १९७८ रोजी जे धोरण आखण्यात आले ते समजावून देण्याकरिता पुणे, नगर, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर या सहा जिल्ह्यांचा संयुक्त दौरा प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणिसांनी २९ मे १९७८ पासून आखला होता; सरचिटणीस गोविंदराव आदिक यांच्या सहीची दोनशे पत्रे पाठवून या दौऱ्याची माहिती जिल्ह्यांना कळविली होती; पण २८ मे रोजी तारा पाठवून हा दौरा रद्द करण्यास नरेंद्र तिडके यांनी भाग पाडले व हा दौरा झाला नाही!

तिडके यांनी या दौऱ्याला विरोध करण्याचे कारण असे सांगतात

पृष्ठ १७ वर

# पुण्यातील एक यशस्वी उपक्रम

# उद्यान मनोरंजन

चंद्रकांत दीक्षित

शाहू उद्यानातील थंडगार हिरवळ. उन्हाळ्यातल्या वातावरणाला मोठी सुखद वाटतीय आणि त्या हिरवळीवर अडीच-तीनशे मुले-मुली मांड्या ठोकून बसलीत. त्यांच्या चेहऱ्यांवर कार्यक्रम काय याची उत्सुकता तर मुलांचे पालक आसपास मोकळे बसलेले. त्यांनाही चला फुकटात करमणूक होणार तर होऊ द्या असे वाटतेय. तोच एका छोट्या तयार केलेल्या स्टेजवर घोषणा होते, 'मुलांनो, आपणापैकी इथे येऊन कोणी गोष्ट सांगणार काय?' काही हात वर होतात. त्यातले काही लगेच खाली होतात; परंतु स्टेजवरचा गुरुशर्ट-पँट चढविलेला तरुण लगेच म्हणतो, 'वाऽवा छान. ये बाळ! हं, काय नाव तुझे?'

आणि नाव सांगताच मघाचा तरुण सगळ्यांना उद्देशून म्हणतो, 'आता हा कुमार तुम्हाला गोष्ट सांगणार आहे बर का.'

आणि तो मुलगा लाजतबुजत गोष्टीला सुरुवात करतो आणि मग एका मागोमाग मुले–मुली आपल्याला येणारी गोष्ट वा गाणी म्हणून जातात. नकळत वातावरणात मोकळेपणा येतो. हसण्याचे-टाळ्यांचे आवाज घुमतात आणि तास-दीडतास केव्हा संपतो याचा पत्तासुद्धा लागत नाही.

शेवटी या कार्यक्रमाचे संयोजक अशा मेळाव्याची भूमिका मांडतात आणि त्यांच्यातले दोघे-तिघे बालमनावर संस्कार होईल अशा गोष्टी सांगतात. कार्यक्रम संपतो.

पुण्याच्या जीवनात 'मे' महिना म्हणजे अनेक व्याख्यानसत्रे, विविध कार्यक्रम, धार्मिक समारंभ वा मेळावे असे समीकरण झाले आहे; परंतु बव्हंशी सांस्कृतिक संस्था व सांस्कृतिक, संस्कारित मेळावे वा वर्ग हे सारे त्या पश्चिम विभागात. त्यामुळे होते काय हा पुण्याचा पूर्वभाग नाही म्हटले तरी उपेक्षित राहतो; परंतु पुण्यातील शिशुरंजन संस्थेने बालकुमार साहित्य संमेलनाच्या सहकार्याने केवळ मुलांसाठी गोष्टींचे मेळावे घेतले. त्यातून बालकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा ही कल्पना.

कुमार मेळावे घ्यावयाचे तर केवळ त्यांच्या मेळाव्यात प्रौढांनी भाषणे ठोकावयाची, मोठ्यांनीच गप्पा हाणायच्या हा प्रकार टाळून मुले-मुली गोळा करावयाची, त्यांनाच प्रोत्साहन द्यावयाचे आणि त्यांनाच मेळाव्यात उभे करून गोष्टी- गाणी म्हणवून घ्यावयाची ही कल्पना अशा मेळाव्यांतून पुढे नेण्यात आली आणि या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणात कौतुक झालेच; परंतु अनेक मुले 'परत कार्यक्रम केव्हा हो?' अशी संयोजकांना विचारताना दिसल्यावर हा उपक्रम विशेषच जाणवला.

सानेगुरुजींना मुलांना गोष्टी सांगण्याचे वेड होते. ते नेहमीच म्हणत, 'जो मुलांचे मनोरंजन करील त्याचे परमेश्वराशी नाते जुळेल!' त्यांच्या पश्चात सानेगुरुजी कथामाला सुरू झाली. इतरही काही उपक्रम सुरू झाले, होत आहेत. शिशुरंजन संस्थाही अशाच प्रकारची. शाळेला सुटी झाल्यावर जागेच्या अडचणीमुळे पालक आपल्या मुलामुलींना खेळण्यासाठी का होईना, शनिवार-रविवारी (निदान) सार्वजनिक बागांतून हिंडवून आणतात. पोरेही हुंदडतात आणि स्वतःलाही आराम मिळतो. घरी जाताना भेळ, शेंगादाणे, फुटाणे, फार झाले तर आइस्फ्रूटच्या कांड्या पोरांना दिल्या की, त्यांचेही कर्तव्य संपते अशी आजची बव्हंशी स्थिती. त्यात कसले संस्कार? आणि कसली संस्काराची पार्श्वभूमी?

नेमकी ही व्यथा नजरेत आल्याने ह्या मेळाव्यांचे संयोजन झाले. कुणी कल्पना काढली असेल ती असो; परंतु कल्पनेचा पसारा मात्र वाढला आहे. या कल्पनेतून जे उद्यानमेळावे झाले, त्यातून मुलांवर संस्कार-शिक्षणाचा नवा उपक्रम साकार झाला एवढे खरे.

कार्यकर्ते नवे काही करावयास उत्सुक; परंतु ज्यांना प्रत्यक्ष काही मदत करता येते असे सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्तेही पुढे आले पाहिजेत; पण ही अडचण पुण्यात तरी आली नाही. कारण तीन–चारशे मुले-मुली गोळा होणार तेव्हा सार्वजनिक बागा ज्यांच्या अखत्यारीत त्या महापालिका भागांची परवानगी घ्यावी लागते. ती मिळाली आणि उपमहापौर ल. सो. जोशी, स्थायीसमितीचे अध्यक्ष मधुकर बीडकर, शिक्षकनेते नगरसेवक भैय्यासाहेब वैद्य, मधुकर निरफराके. आदींनी सक्रिय साहाय्य केले. उपमहापौर जोशी तर उपक्रमाचा शुभारंभ करण्यासाठी जातीने उपस्थित झाले–म्हणजे ज्याला इतर ठिकाणी उद्घाटन म्हणतात त्याला. त्यांनी कार्यक्रम सुरू करून दिला व नुसत्या शुभेच्छा न देता अशा संस्कारांतून शिक्षणासाठी महापालिकेचे पाहिजे ते सहकार्य दिले जाईल असे त्यांनी स्पष्ट सांगितले.

संभाजी उद्यान, सारसबाग, घोरपडे उद्यान, शाहू उद्यानातून लागोपाठ हे 'उद्यान–मनोरंजन मेळावे' उत्साहाने झाले. मुलांना हा प्रकार नवा. पालकांनाही नवा. त्यामुळे मेळावे गाजले. सायंकाळची वेळ झाल्यावर संस्थेतर्फे कुणीतरी डायसवर उभे राहून मेळाव्याची कल्पना दिल्यावर बालभारतीच्या बालगीताच्या रेकॉर्डसनी वातावरणनिर्मिती होते अन् पोरं जमल्यावर त्यांच्यातील सुप्त गुणांना कार्यकर्त्यांकडून चेतविले जाते. मग काय 'वन्हि चेतवीताची चेततो!' भराभर मी–मी करीत पंधरा–वीस मुलंमुली संयोजकांकडे नावे देतात. 'मी गोष्ट सांगणार, मी गाणे म्हणणार!' आणि हंशा–टाळ्यात कार्यक्रम रंगतो.

मुलांना अडचण अशी की, संयोजक व कार्यकर्त्यांना काय म्हणावयाचे? गुरुजी! मास्तर!! काहीच न म्हणता फक्त नाव देणे

एवढेच होते. चार–दोन गोष्टी–गाणी झाली की प्रा श्रीधर राजगुरु मुलांकडून तालात टाळ्या वाजवून घेतात. पोळ्या लाटण्यास सांगतात. ताठ बसण्याचे फायदे सांगतात, तर काही वेळा 'की जय' असा सामुदायिक जयघोष करून घेतात. हसत–खेळत व्यायामाचाच प्रकार. नवे चैतन्य, नवा जोम आला की परत एखादी मुलगी गाणे गातेय, झकास. तेवढ्यात आले–आले, आजचे प्रमुख पाहुणे आले अशी कुजबुज होते. ज्या विभागात हा मेळावा त्या भागातले नगरसेवक, प्रमुख कार्यकर्ते या वेळी उत्साहाने मेळाव्यास आले–गेले.

मुलांचे कार्यक्रम संपल्यावर मग कधी सुधाकर प्रभू, दत्ता टोळ, राजाभाऊ मंगळवेढेकर पु. ग. वैद्य, सौ. शामला शिरोळकर आलटून–पालटून एखादी झकास कथा साभिनय सांगतात. पोरेही खूष ! पालक मनात म्हणतात, बरे झाले. वेळ चांगला गेला; पण पोरे रमली बर का ! घटकाभर करमणूक झालीच; पण मुलांवर काही निश्चित संस्कार झाले. शेवटी कार्यक्रमात गोष्टी–गाणी म्हणणारी मुले–मुली पाहुण्यांकरवी गोष्टीची पुस्तके भेट घेतात. सहज दीड तास गेलेला असतो.

पण अशा संस्था वा कार्यकर्ते यांच्या कार्याला मर्यादा ही राहणारच. छोट्यांसाठी गोष्टीचे मेळावे भरविणे महापालिका शिक्षणमंडळाने मनावर घेतले तर फार मोठे काम होईल. नुसत्या मनपा शाळेतून साठ हजारांहून अधिक विद्यार्थी आहेत, मनपा त्यांतल्या अनेकांना पाटी–पेन्सिली; कपडे व खाणे पुरविते तर विनाखर्चाची अशी योजना त्यांनी का राबवू नये ? पण हा संस्काराचा प्रश्न आहे. तो मुलांवर झालाच पाहिजे असा आग्रह धरणारे नगरसेवक आहेत, त्यांनी हा प्रश्न रेटला पाहिजे.

असे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर झाले तर ज्या कार्यकर्त्यांनी पदराला खार लावून नवी योजना कार्यान्वित केली त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. अर्थात ते त्यांचे कार्य करीत राहातीलच; पण सार्वजनिक रूप यावयाचे तर मोठ्या स्वायत्त संस्थांनीच त्यात भाग घेतला पाहिजे. □


**५००/- रूपयांची भेट**

**तुमच्या ममतेच्या माणसासाठी अन ...तुमच्यासाठी देखील !**



ही भेट
कसकशी
वाढत जाते पहा.

युनियन बँकेच्या
डिपॉझिट री-इन्व्हेस्टमेन्ट सर्टिफिकेट
योजने द्वारा तुमचा दुहेरी फायदा

तुमची भेट कशी वाढत जाते पहा

| मुदल | ६० महिने | ७२ महिने | ८४ महिने | ९६ महिने | १०८ महिने | १२० महिने |
|---|---|---|---|---|---|---|
| रु. ५००.०० | ७२५.०० | ८५१.०० | ९३२.२५ | १०१९.२५ | १११४.०० | १२१७.७५ |

- भरपूर करमुक्त मोबदला (वार्षिक रु. ३०००.०० पर्यंतची. बँकेतील ठेवीवरील व्याजाची रक्कम आयकरमुक्त असते.)
- तुमच्या मिळत जाणाऱ्या व्याजाची पुनर्गुंतवणूक होऊन त्यायोगे तुमचे मुद्दल वाढतच राहते.

विशेष म्हणजे, आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तींना ही जी भेट आपण द्याल ती वाढत...वाढत... वाढत जाणारी आहे.

डिपॉझिट री-इन्व्हेस्टमेंट सर्टिफिकेट योजनेखाली वेगवेगळ्या रकमा व वेगवेगळ्या मुदतींची निवड आपण करू शकता.

*आम्ही तुम्हाला मदत करू; तुम्ही स्वावलंबी बना*
**युनियन बँक ऑफ इंडिया**
(भारत सरकार अंगीकृत)

Interpub/UBI/3/77/MR

आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांना विकासमार्गावर आणण्यासाठी जनतापक्षाने सत्याग्रह–घेरावचा कार्यक्रम योजून चढाईचा स्वागतार्ह पवित्रा घेतलेला आहे. आदिवासींचे प्रश्न कोणते, मागण्या काय आहेत, यापूर्वी काय काम झाले–न झाले, यापुढे तातडीने कोणते कार्यक्रम हाती घ्यायला हवेत–घेणे सध्याच्या चौकटीतही शक्य आहे, यावर विचारविनिमय करण्यासाठी 'ग्रामायन'ने एक चर्चासत्र आयोजित केले होते. चर्चासत्राचा हा आढावा —

# आदिवासी विकास कार्यक्रम आणि 'ग्रामायन'

१ एप्रिल १९७८ या दिवशी हे चर्चासत्र पुणे येथे झाले. 'महाराष्ट्रातील आदिवासींच्या समस्या' हा विषय होता. आदिवासी भागात काम करणारे अनेक कार्यकर्ते, सरकारी अधिकारी या चर्चासत्राला उपस्थित होते. चर्चेचे संचलन पालघर तालुक्यातून विधानसभेवर निवडून आलेले आमदार श्री. अर्जुन शिंगाडे यांनी केले.

चर्चेसाठी एक टिपण 'ग्रामायन'चे कार्यकर्ते श्री. शरद कुलकर्णी यांनी तयार केले होते. त्याआधारे चर्चा झाली. टिपण पुढीलप्रमाणे होते.

महाराष्ट्रातील सुमारे सहा टक्के जनता आदिवासी जमातीची असून तिची एकूण संख्या सुमारे चाळीस लाख आहे. या समाजातील बहुसंख्य लोक दारिद्र्यरेषेखाली असून त्यांना आजवरच्या आर्थिक नियोजनाचा फारसा फायदा झालेला नाही. आदिवासींच्या समस्या विशेषत: आर्थिक समस्या सोडविण्यासाठी काही खास उपाय योजणे आवश्यक आहे, याविषयी आता दुमत नाही. दुर्दैवाने ज्या पोटतिडकीने आदिवासींच्या गरिबीविषयी बोलले जाते त्या पोटतिडकीने त्यांच्या बाबतच्या योजना मात्र अंमलात येत नाहीत असा आजवरचा अनुभव आहे. आदिवासींच्या हिताच्या काही योजना अंमलात आणताना काही प्रस्थापित हितसंबंधांना धक्का पोहोचणे अपरिहार्य आहे. या योजना अंमलात येताच हे प्रस्थापित त्याविरुद्ध काहूर माजवितात आणि या योजनांची अंमलबजावणी परिणामकारक होऊ न देण्यात यशस्वी होतात असाच आजवरचा अनुभव आहे. आदिवासी समाजात कार्य करणारे कार्यकर्ते या प्रस्थापित हितसंबंधीयांच्या कारवायांवर मात करण्यात एकंदरीत आजवर फारसे यशस्वी ठरलेले नाहीत. या समस्या सोडविण्यातील दिरंगाई व अकार्यक्षमता कमी व्हावी या दृष्टीने ग्रामायनचा प्रयत्न आहे.

## जमिनीची समस्या

गेल्या अनेक वर्षांत आदिवासींच्या मालकीची हजारो एकर जमीन बिगर आदिवासींनी बळकाविली. याविरुद्ध झालेल्या असंतोषाचा व चळवळीचा परिणाम म्हणून सरकारने आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरावर बरेच निर्बंध घातले आहेत. (महाराष्ट्र कायदा ३५।१९७४) तसेच काही वर्षे अगोदर हस्तांतरित झालेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात म्हणून कायदे केले आहेत. (३५।१९७४ व १४।१९७५ या कायद्यांच्या) (विशेषत: कायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी परत करण्याच्या कायद्याच्या) अंमबजावणीत अनेक अडचणी आल्यामुळे जवळजवळ पन्नास टक्के प्रकरणे अयस्वी झाली. त्यामुळे या कायद्यात काही दुरुस्त्याही करण्यात आल्या. या कायद्यांमुळे जमीन परत मिळावी असा मूळ आदिवासी मालकाचा अर्ज नसतानाही जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी करून त्या मालकाला जमीन परत देता येते; परंतु अशा तऱ्हेने चौकशी झालेल्या प्रकरणांची संख्या अतिशय कमी असणे स्वाभाविक आहे. ह्यामुळे मूळ आदिवासी मालक जमिनीच्या मागणीसाठी अर्ज दाखल करतील अशी खटपट कार्यकर्त्यांनी करणे आवश्यक आहे; परंतु कायदेशीर व बेकायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी परत मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाची मुदत ६ जुलै १९७७ रोजी संपली. ती वाढविण्यासाठी या दोन्ही कायद्यांत दुरुस्ती होणे आवश्यक आहे. यासाठी कार्यकर्त्यांना विशेष प्रयत्न करावे लागतील. अशा प्रकारची दुरुस्ती झाल्याशिवाय जमिनी परत मिळविण्याच्या प्रयत्नांना जोर येणार नाही. या कायद्यांच्या अंमलबजावणीत आणीबाणीच्या काळात काहीसा वेग आला होता हे मान्य केले, तरी निवडणुकीच्या काळात हे काम जवळजवळ स्थगित होते. त्यानंतर सरकारने एप्रिल १९७७ मध्ये एक गुप्त परिपत्रक काढून या दोन्ही कायद्यांची अंमलबजावणी स्थगित केली होती अशा रीतीने नोव्हेंबर १९७६ ते जुलै १९७७ या काळात या कायद्यांची अंमलबजावणी स्थगित होती हे खास नमूद केले पाहिजे.

**जंगल जमिनीची समस्या :** जंगलाखाली म्हणून जंगल खात्याच्या कागदपत्रांत दाखविलेल्या परंतु प्रत्यक्षात गेली कित्येक वर्षे आदि-

वासी कसत असलेल्या जमिनी त्यांच्या नावावर व्हाव्यात म्हणून आजवर झालेले प्रयत्न फारसे यशस्वी झालेले नाहीत. सरकारी अधिकारी मधूनमधून अशा आदिवासींना हुसकावून लावतात, तसेच दंड (व स्वतःसाठी लाच) वसूल करतात. याबाबतीत एक निश्चित तारीख ठरवून तोपर्यंत लागवडीखाली असलेली जमीन आदिवासींना कायदेशीरपणे देण्यात यावी. जेथे हे अगदीच अशक्य असेल तेथे त्यांना दुसरीकडे जमीन दिली पाहिजे. या सर्व प्रश्नांकडे कार्यकर्त्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

## वेठबिगार (बॉंडेड लेबर)

१९७५ मध्ये जाहीर झालेल्या सरकारी २० कलमी कार्यक्रमात वेठबिगारपद्धत नष्ट करणे हे एक महत्त्वाचे कलम होते. त्यानंतर याबाबतीत भारत सरकारने एक अध्यादेश जारी केला (१७।१९७५) त्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर झाले (१९।१९७६). महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्यात वेठबिगार पद्धत अस्तित्वातच नाही असे जाहीर करून या कायद्याची अंमलबजावणी टाळली; परंतु अशा प्रकारची पद्धती महाराष्ट्रातही अस्तित्वात आहे असे वेगवेगळ्या नियतकालिकांत सोदाहरण प्रसिद्ध झाल्यानंतर सरकारने नोव्हेंबर १९७६ मध्ये या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीचा अहवाल ३१ ऑक्टोबर १९७७ मध्ये विधानसभेत सादर करण्यात आला; पण या अहवालावर अद्याप चर्चा झालेली दिसत नाही. या अहवालात महाराष्ट्रात वेठबिगार पद्धत आदिवासींत अनेक ठिकाणी चालू आहे असे स्पष्ट नमूद करण्यात आले असून ती नष्ट करण्याविषयी अनेक विधायक सूचना करण्यात आल्या आहेत. या दृष्टीने कार्यकर्त्यांनी आपापल्या भागातील वेठबिगार शोधून त्यावर उपाय योजना करण्यासाठी सरकारवर दडपण आणणे आवश्यक आहे.

## एकाधिकार व्यापार

आदिवासींचे शोषण फार मोठ्या प्रमाणावर सावकारांकडून होते. हे टाळण्यासाठी सरकारने ९ ऑक्टोबर १९७६ रोजी एक अध्यादेश जारी केला (८।१९७६). या अध्यादेशावर आधारलेला कायदा पुढे झाला (५।१९७७). या कायद्यान्वये सरकारला कोणत्याही विशिष्ट आदिवासी विभागात निर्देशित वस्तूंच्या खाजगी व्यापारावर व कर्ज देण्यावर बंदी घालण्याचा अधिकार देण्यात आला व सुरुवातीला हा कायदा नवापूर व मेलघाट या तालुक्यांना लागू करण्यात आला. या विरुद्ध हितसंबंधीयांनी अर्थातच खूप ओरड केली. ११ ऑक्टोबर १९७७ रोजी सरकारने या कायद्यातील अधिकार वापरून जुन्नर, आंबेगाव, पेठ, सुरगाणा, मेलघाट, गडचिरोली व सिरोंचा या सात तालुक्यांत काही वस्तूंच्या खाजगी व्यापाराला बंदी घातली. मात्र अशी बंदी अगोदरच असलेला नवापूर तालुका या यादीतून वगळण्यात आला. (ही गोष्ट तेथील राजकीय दबावामुळे झाली हे नंतर मान्य करण्यात आले). या बंदीविरुद्ध व्यापाऱ्यांनी फार ओरड केली व लोकसभा निवडणुकीपूर्वी १२ डिसेंबर १९७७ रोजी सरकारने ही बंदी पूर्णपणे मागे घेतली. आज हा कायदा कायदेपुस्तकात आहे. एवढा पुरागामी कायदा महाराष्ट्र सरकारनेच केला अशी प्रौढी मारली जाते; पण प्रत्यक्ष निर्बंध कोठेही लागू नाहीत. काही वस्तूंच्या बाबतीत निर्बंध लादून या कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणी समजावून घेता येतील. याही बाबतीत कार्यकर्त्यांनी जागरूक राहणे आवश्यक आहे.

## आदिवासी उपयोजना

आदिवासी उपयोजनेखातर अनेक जिल्ह्यांत काही कामे चालू आहेत. यासंबंधी काही बातम्या मधून मधून वृत्तपत्रात येत असतात. दुर्दैवाने कोणत्याही जिल्ह्यात निश्चित काय केले जाणार आहे याची माहिती मागूनही दिली जात नाही. या योजनेच्या कार्यवाहीकडे कार्यकर्त्यांनी अधिक लक्ष दिले पाहिजे.

वरील टिपण व कार्यकर्त्यांचे अनुभव या अनुषंगाने झालेल्या चर्चेतील काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत –

महाराष्ट्र बँकेचे मनोर येथे आदिवासी क्षेत्रात काम करणारे श्री. प्रकाश जावडेकर यांनी आदिवासींच्या नावावर असलेली जमीन अनेक ठिकाणी प्रत्यक्षात बिगर आदिवासीच कशीत असतात, म्हणून त्यावर काही उपाययोजना करावी असे सांगितले.

ग्रॅज्युएट व्हॉलंटिअर स्कीमखाली पालघरजवळील खेड्यात काम करणाऱ्या श्री. बागूल यांनी काही बिगरआदिवासी, आदिवासींच्या नावावर सहकारी सोसायट्यांकडून कर्जे काढतात व त्याची फेड करण्याची जबाबदारी मात्र नाकारतात अशी तक्रार केली.

आदिवासी उपयोजनेखाली होणाऱ्या खर्चाचा फायदा अनेक ठिकाणी बिगरआदिवासींनाच मिळतो. उदाहरणार्थ अनेक आदिवासी विभागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई उन्हाळ्यात भासते. खरे तर आधी पिण्याच्या पाण्याची सोय सर्व आदिवासी पाड्यांवर करण्यात यावी; पण या काही भागात विद्युतीकरणाच्या योजनांना अग्रक्रम दिला जात आहे. अर्थात विजेची कनेक्शन्स बहुतेक बिगरआदिवासीच घेऊ शकतात.

आदिवासी आश्रमशाळांत फक्त आदिवासी शिक्षकच न नेमता काही बिगरआदिवासी शिक्षक मुद्दाम नेमावेत अशी सूचना एका कार्यकर्त्यांनी केली. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचा संबंध बिगर-आदिवासींशी येत राहील.

आदिवासी विभागात रोजगार हमी योजना चांगल्या रीतीने राबविली गेल्यास आदिवासींची उपासमार कमी होईल व सावकारांकडून होणाऱ्या शोषणासही आळा बसण्यास मदत होईल असे मत अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

आदिवासी विभागातील सरकारी एकाधिकार व्यापाराविषयी कार्यकर्त्यांत दोन प्रकारची मते दिसली. काही कार्यकर्त्यांनी ही योजना राबवावी व व्यापाऱ्यांकडून आदिवासींचे होणारे शोषण थांबवावे असे मत व्यक्त केले, तर काही कार्यकर्त्यांनी या योजनेची अंमलबजावणी नोकरवर्गाकडून नीट होणे शक्य नाही असे सांगून एकधिकार व्यापार योजनेस विरोध केला. मात्र कोणत्या तरी यंत्रणेमार्फत आदिवासींच्या वस्तू खरेदी करण्याची सोय असावी व याद्वारे आदिवासींना योग्य भाव मिळण्यास मदत करावी याविषयी सर्वच कार्यकर्त्यांत एकमत दिसून आले.

बँकिंगसाठी आदिवासी शेतकऱ्यांना व इतरही छोट्या शेतकऱ्यांना

मिळणारे अनुदान कमी असल्यामुळे ही कामे होत नाहीत. तरी अनुदान वाढवून द्यावे असे मत शहादा विभागात काम करणारे कार्यकर्ते श्री. तुळशी परब यांनी व्यक्त केले.

आदिवासी सहकारी सोसायटीचे मुख्य मार्केटिंग अधिकारी श्री. पंडित यांनी आदिवासी विभागात आपल्या संस्थेतर्फे खरेदी-विक्री कशी चालते ते समजावून सांगितले.

अनेक कार्यकर्त्यांनी आदिवासी समाजात शिक्षणावर जास्त भर द्यावा असे सांगितले व अध्यक्ष श्री. शिंगाडे यांनी त्याला दुजोरा दिला.

आदिवासी विभागात छोटे उद्योगधंदे विकसित करण्याकडे सरकारने अधिक लक्ष द्यावे असेही मत व्यक्त करण्यात आले.

पुण्याजवळील चिंचवड येथील तांत्रिक शिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. मनोहर जांभेकर यांनी आदिवासी तरुणांना नेतृत्व व विकास यांचे शिक्षण देण्यासाठी खास संस्था काढावी अशी शिफारस केली व त्यासाठी एक योजनाही सादर केली.

कार्यकर्त्यांचे अनुभव, सरकारी योजना व अस्तित्वात असलेले कायदेकानू लक्षात घेता पुढील गोष्टी तातडीने अंमलात याव्यात, यासाठी कार्यकर्त्यांनी आग्रह धरावा, असे 'ग्रामायन'ला वाटते –

१ : आदिवासींच्या पूर्वी हस्तांतरित झालेल्या जमिनी संबंधित सरकारी अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन त्यांना परत मिळवून दिल्या पाहिजेत.

२ : जंगलाखाली म्हणून दाखविलेल्या पण प्रत्यक्षात आदिवासी कशीत असलेल्या जमिनी त्यांच्या नावांवर झाल्या पाहिजेत.

३ : वेठबिगार पद्धत आदिवासी भागात अस्तित्वात असल्याने ती नष्ट करण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत.

४ : आदिवासींच्या नावांवर जमीन कसण्यास, तसेच त्यांच्या नावांवर सहकारी संस्थांतून कर्जे काढण्यास बिगर आदिवासींना बंदी करण्यात यावी.

५ : आदिवासीक्षेत्रात पिण्याच्या पाण्याची सोय करण्यास अग्रक्रम देण्यात यावा. येत्या वर्षात ते काम पूर्ण व्हावे.

६ : आदिवासीक्षेत्रात रोजगार हमी योजनेची माहिती विस्तृत प्रमाणावर जाहीर करण्यात येऊन ती कामे सुरू करण्यात यावीत.

७ : बंडिंगसाठी आदिवासींना सध्या मिळणारे अनुदान अपुरे आहे. ते वाढवून देण्यात यावे.

८ : आदिवासींची सुधारणा होण्यासाठी शिक्षण-प्रसार हा प्रमुख उपाय आहे. यासाठी आश्रम-शाळांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ व्हावी. या कामी स्वयंसेवी संस्थांना उत्तेजन देण्यात यावे.

□

---


कालच्या
बायसिकल थीव्हजपासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी–विदेशी
चित्रपटांची ओळख

**टच**

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : १० रुपये

पुस्तके

# सत्तेचे मोहरे

## महाराष्ट्र काँग्रेसपक्षाचा वेधक आलेख

'Politics is a game of & scoundrals' असे म्हणत तथाकथित राजकारणी राड्यापासून दूर पळून सुरक्षिततेच्या कोशात लपू पाहणाऱ्या मध्यमवर्गाला 'राजकारण हा चविष्ट गप्पांचा, फुरसतीच्या वेळेचा शौक नाही, एखाद्या धूर्त व्यक्तीचा सत्तांधस्वार्थीपणा नाही, तर त्यापाठीमागे विशिष्ट शक्ती असतात, तत्त्वज्ञान असते आणि वावटळीसारखा घोंघावत सुटणारा तो बेफाम झोत नसून त्याला स्वतःची गती, स्वतःचे नियम असतात आणि दैनंदिन जीवनाशी याचा अतिशय निकट संबंध असतो. त्यामुळे राजकारण खेळणे न खेळणे बाजूस ठेवले तरी त्याचा शास्त्रोक्त व वस्तुनिष्ठ पायावर अभ्यास करणे आवश्यक आहे', अशी जाणीव 'सत्तेचे मोहरे' हे जगन फडणीस यांनी लिहिलेले पुस्तक वाचताना प्रकर्षाने होते. १९३७ सालच्या संयुक्त प्रांतिक मंत्रिमंडळापासून ते ७८ च्या संभाव्य फुटीपर्यंतच्या महाराष्ट्र काँग्रेसच्या पडद्यामागील राजकारणाचे भेदक दर्शन त्यांनी या पुस्तकात घडविले आहे.

### बड्यांची सत्तालोलुपता

सौराष्ट्र मुंबई राज्याला जोडण्यामागे, नेहरूंच्या प्रभावाखालील हुकमी बहुमताच्या उत्तर प्रदेशाला शह ही पटेलांची 'मुद्द' तर त्यामुळे मराठी माणसे अल्पमतात जातील, हा मोरारजींचा डाव ! महाराष्ट्रातील आपल्या स्थानास धक्का पोहोचू नये म्हणून विदर्भ-मराठवाडा व प. महाराष्ट्र यांना आळीपाळीने लोणी लावीत कोलांट्या उड्या मारणारे यशवंतराव ! वसंतदादा डोईजड होऊ नयेत म्हणून वसंतराव नाइकांनी मंत्रिपद देऊन त्यांच्याकडून काढून घेतलेले प्रांतअध्यक्षपद आणि त्यांनाच उडवन शंकररावांना पाठिंबा देणारे वसंतदादा आणि या सर्वांच्या बरोबरीने मुख्यमंत्रिपदाच्या बोहल्याचे उत्सुक यशवंतराव मोहिते, बाळासाहेब देसाई व शरद पवार यांनी सातत्याने बदललेल्या भूमिका यांचं अगदी बारकाव्यानिशी सरस चित्रण या समाचारच्या वार्ताहराने घडविले आहे. भाऊसाहेब हिऱ्यांना डावलताना मोरारजींनी यशवंतरावांना दिलेली पुढे चाल, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळेपासून महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे आहेत असे म्हणत समाजवादी व शे. का. प. च्या मंडळींना फोडणारे यशवंतराव, सतत दुर्दैवी राहिलेले शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे व बाळासाहेब देसाई आणि अचानक कन्नमवारांची वर्दी लागल्याने खचलेले नाईक इ. घटनांबाबत लिहिताना द्वैभाषिक राज्य–संयुक्त प्रांत, संयुक्त महाराष्ट्र चळवळ याची पुरेशी पार्श्वभूमी लेखकाने सादर केली आहे. दर मुख्यमंत्री बदलप्रसंगी घडणाऱ्या घटना, घेतले जाणारे पवित्रे, वारेमाप उधळपट्टी, 'वरचा' हस्तक्षेप, तंग वातावरण आणि या सर्व प्रकरणांमागे कार्यरत असणारा आर्थिक हितसंबंधांचा गट याची सविस्तर माहिती लेखकाने अंतर्गत लफड्या-कुलंगड्यांसकट दिली आहे. शेतकऱ्यांचे पाईक असे म्हणत बड्या जमिनदारांचे रक्षणकर्ते नाईक, शुगर सिंडिकेटला नामोहरम करण्यासाठी ऑडिटे व जप्त्या आणणारे शंकरराव चव्हाण, याच शंकरराव–प. कृ. सावंत गटास ठरवून पाडण्यासाठी १९७७ च्या लोकसभा निवडणूकप्रसंगी मराठवाडा व कोकणात झालेले 'शक्तीचे' प्रयोग आणि मुंबईतील मक्तेदार उद्योजकांना हाताशी धरणाऱ्या रजनी पटेलांची नाइकांशी 'डिप्लोमसी' यावरचे 'कोकसिंग' जगन फडणिसांच्या लेखणीतून अगदी जिवंतपणे उतरले आहे.

### जातीयवादी राजकारणाचा तमाशा

काँग्रेस पक्षाच्या म्होरक्यांच्या बदलणाऱ्या निष्ठांचा मागोवा घेताना त्याच्या जातीयवादी राजकारणाचा पैलूही लेखकाने पुरेसा स्पष्ट केला आहे. बहुजनसमाजाचे नेते म्हणून यशवंतरावांच्या कसरती व त्यांना मोरारजींनी मुद्दाम हिरेंविरुद्ध फितविणे, तत्पूर्वी खेर-देव-देवगिरीकर विरुद्ध जेधे, चव्हाण, मोरे यांची जुगलबंदी, इतकेच काय पण 'मुख्यमंत्री बिगरमराठा असला तरी आमदार, खासदार, सरपंच, सभापती, चेअरमन इत्यादी पदे मराठ्यांकडेच आहेत असे इंदिराजींना पटवून उमेदवारयादीतून 'पाटील-देशमुख' कमी करणारे व नुकताच इंदिरा गांधींना पाठिंबा देताना 'बिगर मराठा लॉबी' उभी करणारे वसंतराव नाईक आणि 'मुख्यमंत्रिपदाचा वाद मराठ्यांनी बंद खोलीत बसून सोडवावा' अशी शालिनीताईंची मुक्ताफळे याचे सूचक दाखले पुस्तकात वेळोवेळी आढळतात. शेटजी-भटजींविरुद्ध सातत्याने कडवी भूमिका घेणारे मा. (माननीय की मार्क्सवादी) यशवंतरावांच्यापासून ते पूर्वीच्या शे. का. प. स्थापनेमधल्या केशवराव जेध्यांच्या सर्व उचापतींचे वर्णन 'सत्तेचे मोहरे' यात आहे. जातीचे स्थान उमेदवार निवडतानाच नव्हे, तर मुख्यमंत्री ठरवितानाही किती महत्त्वाचे ठरले, याचे विदारक चित्रण त्यामधून डोळ्यांसमोर उभे राहते.

### पडद्यामागील घडामोडी

आणि अर्थातच हे सर्व घडत असताना काही गोष्टींचा उलगडाही आपोआप होत जातो. विनोबांना असणारे अनन्यसाधारण महत्त्व, बदनाम स. का. पाटलांची महाराष्ट्रवादी भूमिका, आणीबाणीत संजय–लीला व मंत्रिमंडळाचा काला खपवून न घेणारे संकटराव ऊर्फ शंकरराव चव्हाण आणि इंडिकेट-सिंडिकेट प्रकरणात एक पाय मळ्यात व एक पाय तळ्यात असणाऱ्या यशवंतरावांची भूमिका यांचे बरेच नवीन पैलू या पुस्तकातून उघडकीस येतात. या पुस्तकातील जगन फडणिसांनी केलेला उल्लेखनीय प्रयत्न म्हणजे

या सर्व रगडचापाठीमागे असणारे गट, लॉब्या व गुंतलेले आर्थिक हितसंबंध यांच्यावर फेकलेला प्रकाशझोत ! विदर्भातल्या बडे बागाइतदारांचे राजे वसंतराव नाईक, मुंबईतील मक्तेदार उद्योजकांच्या माळेतले 'लालसर' रजनी पटेल, पुण्या–मुंबईच्या निमित्ताने बड्या भांडवलदारांशी नाइकांनी केलेली चंबाचंबी आणि पश्चिम महाराष्ट्रातील शुगर सिंडिकेटचा असलेला प्रभाव आणि दबदबा यांचे या घडणाऱ्या प्रत्येक घटनेशी कोणत्या स्वरूपात व कसे लागेबांधे होते याची काहीशी कल्पना हे पुस्तक वाचताना येते आणि या बड्या मंडळींच्या पाठिंब्यावर ही सत्तेची मोहरी हालत होती याचीही जाणीव होते. वसंतराव नाइकांच्या कारकीर्दीत सचिवालयातील बोकाळलेली नोकरशाही, पत्रकारांच्या मागे असणारा गुप्तहेरांचा ससेमिरा याही गोष्टी त्यांनी कटाक्षाने प्रस्तुत केल्या आहेत ! आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'बाळासाहेब देसाईंचा राजीनामासंबंधित बातमी आपल्या वृत्तसंस्थेने छापली नाही याचे विश्लेषण करताना त्यांनी केलेली सूचक मीमांसा, 'कधी सरकार, कधी व्यवस्थापनाला जवळचा असणारा पक्ष व त्यांचे नेते, बडे जाहिरातदार व मालक यांची दडपणे वार्ताहरावर असतातच,' ही कटू वस्तुस्थिती त्यांनी प्रांजलपणे उघड केली आहे.

अशा कित्येक सफाईदार गोष्टी अंतर्भूत असल्या तरी काही महत्त्वाच्या त्रुटी मात्र जाणवतात ! एक तर सर्व घटना, प्रसंग व वर्णने मुंबई–दिल्लीतील आहेत आणि प्रत्यक्षात मात्र या राजकारणाची सूत्रे जिल्हा परिषदा, पंचायतसमित्या, सहकारी सोसायट्या, बँका व जिल्हा पातळीवरील आमदार यांच्याच आखाड्यात असतात. त्यामुळे सर्व घटनांचे खोल व अचूक निदर्शन फारच थोडे आढळते; किंबहुना दूरदर्शनाच्या कॅमेऱ्याचा 'धावता आढावा' काही वेळा डोळ्यांसमोरून जातो. संपत्तीच्या व सत्तेच्या नाड्या हातात असणाऱ्या, हितसंबंध गुंतलेले असणाऱ्या आर्थिक गटांचे राष्ट्रीय स्वरूप व त्याचे परिणाम लेखकाने कुठेच नीटपणे स्पष्ट केलेले नाहीत; तर त्याबाबत संदिग्धताच आहे. लेखकाने स्वतःच्या मताचा उल्लेख कुठेच केलेला नाही. दिल्लीतील हस्तक्षेपाबाबत फारच अपुरी माहिती हीदेखील एक खटकण्यासारखी गोष्ट आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे तथाकथित पुरोगामी स्वरूप उघड करताना अभिप्रेत असणारा सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञानाची सुसूत्रता याचाही अभाव प्रकर्षाने जाणवतो. मुख्य म्हणजे काँग्रेसचा 'कार्यक्रम' 'धोरणे' यावर सूतोवाचही लेखकाने केलेले नाही. तसेच प्रस्तुत पुस्तक वाचताना ग्रामीण व शहरी विभागातील संबंध यांचा उल्लेख तर नाहीच; पण कोकण, खानदेश इ. महत्त्वाच्या भागांना व रत्नाप्पा कुंभार, शंकरराव मोहितेपाटील इत्यादी काही अंशी निर्णायक असणाऱ्या शक्तींचा उल्लेखही जगन फडणिसांनी केलेला नाही. एकंदरीत व्यक्तिनिष्ठ व माहितीपूर्ण असे कथनाचे स्वरूप असल्यामुळे विस्कळितपणा व पुनरावृत्ती यांचीही सतत जाणीव होते. नोकरशाहीतील भ्रष्टाचार, जुळी–मुंबई प्रकरणातील मक्तेदार यांच्याबाबतही काहीशी संदिग्धता लेखकाने ठेवली आहे.

पण या सर्व बाजू लक्षात घेऊनही प्रसंगांना अचूक शब्दात पकडण्याचे सामर्थ्य, व्यक्तिरेखांना त्यांनी दिलेला न्याय, पत्रकाराचे हाल आणि पत्रकारितेतील बारकावे व कसब यामुळे काँग्रेसने केलेल्या फसवणूक व पिळवणुकीच्या राजकारणी बाजूची तीव्रता अजिबात कमी होत नाही. 'राजकारण हे सावळा-गोंधळ, अतर्क्य घटना, चिखल व पैसेवाल्यांचा खेळ असे 'व्हेग' नसते तर त्याचेही एक तत्त्वज्ञान आणि दिशा असते हे स्पष्ट करण्यात श्री. फडणीस यशस्वी झाले आहेत आणि म्हणूनच १९३७ च्या प्रांतिक काँग्रेसपासून १९७८ पर्यंतच्या काँग्रेसची चीरफाड करताना काँग्रेसची काळी बाजू दाखवून राजकारणाविषयी सतत सतर्क ठेवण्याची प्रेरणा हे पुस्तक निश्चितच देईल !

—रमण देशपांडे

सत्तेचे मोहरे
जगन फडणीस
ग्रंथाली प्रकाशन
मूल्य १८ रुपये

# आमचे ग्रंथालय

## The Two

By Irving Wallace & Amy Wallace.
( Library Edition
By Simon & Schuster & Paperback by Bantam Books Inc,

मी लहान असताना अमक्या बाईला ट्वीन्स झाले असे किती तरी वेळा ऐकत असे; पण कधी मोठी माणसे गप्पा मारताना तमक्या बाईला सायमीझ ट्वीन्स झाले असे ऐकत असे त्या वेळी मी बुचकळ्यात पडत असे. थोडा मोठा झाल्यावर सायॅमीझ मांजर, सायॅमीझ पांढरा हत्ती, थायलंडची सायॅमीझ भाषा असे शब्द कानांवर किंवा वाचण्यात येत असत. यांपैकी सायमीझ मांजर म्हणजे छोट्या केसांची व निळ्या, तिरक्या डोळ्यांची मांजर एकदा पाहिली होती या सायमीझ मांजराच्या तोंडावर, पायावर व शेपटीवर जास्त गडद रंग असतात व या मांजराचा रंग पाडसासारखा असतो.

एकदा फार वर्षांपूर्वी टाइम्स ऑफ इंडियामध्ये वाचल्याचे आठवते की 'सायॅमीझ ट्वीन्स' म्हणजे दोन जुळे भाऊ किंवा बहिणी हे एका अस्थिबंधनाने (ligament) जोडलेले असतात. आर्यविंग व एमी वॉलेसचे हे पुस्तक जगातल्या 'पहिल्या' सायॅमीझ ट्वीन्सवरती आहे. या अस्थिबंधनाने जोडलेल्या सायॅमीझ जुळ्यांची नावे होती चँग आणि एंग. त्यांचा जन्म मॅकलांग, थायलँड (सायाम) येथे ११ मे १८११ रोजी झाला होता आणि तेव्हापासून सायॅमीझ ट्वीन्स हा वाक्प्रचार प्रचलित झाला.

सबंध मानवजातीच्या उत्क्रांतीच्या इतिहासात अस्थिबंधनाने जखडलेले जुळे पहिल्यांदा १८११ मधेच कसे झाले ? १८११ नंतर मात्र कधीकधी असे जुळे जन्माला आल्याचे, वाचल्याचे आठवते. काही सायॅमीझ जुळी जन्मानंतर फार दिवस जगली नसतील. कधीकधी त्यांना सुटे करण्याच्या शस्त्र-

क्रियेतच त्यांचा प्राण जातो. चेंग आणि एंग मात्र या जोडलेल्या अवस्थेत ६३ वर्षे जगले. १७ जानेवारी १८७४ या दिवशी पहिला एक व दुसरा तीन तासांनी मरण पावला ! या सायॅमीझ जुळ्या भावांनी १८४३ मध्ये मिस साय व एडलाइड येटस् या दोन सख्ख्या बहिणींशी लग्नेही केली होती ! चेंगला दहा तर एंगला बारा संतती झाल्या होत्या ! उभी हयात दुसऱ्याला चिकटून रहाणे म्हणजे एक प्रकारचा कारावासच म्हणावा लागेल ! 'जग हे बंदीशाला...जो तो आपुल्या जागी जखडे...' ते दोघे एक होते. ते एक दोघे होते ! स्वतंत्र अस्तित्व ही काय चीज आहे ते चेंगलाही माहिती नव्हते व एंगलाही माहिती नव्हते ! मग ते त्यांना हवे हवेसे कसे वाटणार ? शेवटी जीवन हा एक अनुभव आहे. काहींना हा अनुभव घाणेरडा वाटतो, तर काहींना सुखकारक. हा अनुभव कितीही घाणेरडा असो, तो प्रत्येकाला घ्यावासाच वाटतो आणि यालाच म्हणतात LIFE ! एखाद्या लंगड्याला मी चालताना पाहतो तेव्हा पहिली मला आठवतात ती ही अक्षरे LIFE.

आणखी एका जुळ्याबद्दल वाचले होते ते डेझी व व्हायॅलेट या दोन बहिणींबद्दल. या दोघींचा जन्म १९०८ मध्ये इंग्लंड येथे झाला होता. या दोघी नितंबातून जोडलेल्या होत्या. अस्थिबंधनांनी जोडलेल्या जुळ्यांपैकी एक जर आधी मेला तर अर्थात ऑपरेशन करून दुसऱ्याला वेगळे करावे लागते. या ऑपरेशनमधेच दुसरा बहुतेक मरतो. या दोन बहिणीही वयाच्या साठाव्या वर्षी बरोबरच मरण पावल्या.

आणखी एका सायामीझ जुळ्याबद्दल मला वाचल्याचे स्मरते. हे जुळेही थायलंडमधेच १९५३ साली जन्माला आले होते. त्यांची नावे प्रीस्ना व नॅपीट ॲटकीन्सन अशी आहेत. या अस्थिबंधनाने जखडलेल्या जुळ्यावर १९५५ मधे अमेरिकेत शस्त्रक्रिया झाली होती. ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली होती. बहुतेक हे दोघेही अजून जिवंत असतील. या दोघांसाठी तरी जग हे दुहेरी बंदीशाला होण्याचे थांबले !

या जुळ्याखेरीज 'मल्टिपल बर्थस' म्हणजे ऑक्टचुप्लेंटस्, सॅप्टचुप्लेंटस्, सॅक्स्टचुप्लेंटस्, क्विन्टुप्लेंटस्, ट्रीप्लेंटस् अशा बऱ्याच मनोरंजक बातम्या आपल्या वाचण्यात येतात. मुले होण्यासाठी ज्या गोळ्या दिल्या जातात त्यामुळे प्रसंगी असे प्रकार होतात.

साधी जुळी मुले होण्याचे प्रमाण ९० गर्भार स्त्रियांमध्ये १ असे आहे. सायॅमीझ ट्वीन्स होण्याचे प्रकार जगात ८।१० झाले असतील. जुळे होण्यामध्ये दोन प्रकार असतात. एक फ्रॅटर्नल व दुसरा आयडेंटिकल. कधीकधी एकाच वेळी एकापेक्षा जास्त स्त्रीबीजे अंडाशयातून निघतात व या स्त्रीबीजांचा समागम वेगवेगळ्या पुबीजाने होतो. असल्या जुळ्यांमधे आनुवंशिकतेचे प्रमाण दोन धाकट्या व थोरल्या भावांमधे असते तसेच असते. असल्या जुळ्यांना फ्रॅटर्नल ट्वीन्स म्हणतात.

आयडेन्टिकल ट्वीन्सच्या प्रकारात स्त्रीबीजाचा पुबीजाशी समागम होऊन ते नंतर दुभंगले जाते. या जुळ्यांची लिंगे सारखीच असतात आणि ती दिसायलाही एकसारखीच असतात. आनुवंशिकतेचे गुणावगुण या दोघांमधे सारखेच असतात. सायॅमीझ ट्वीन्स हे आयडेंटिकल ट्वीन्सच असतात; परंतु जेव्हा समागम झालेले स्त्रीबीज दुभंगते तेव्हा शरीराचा एखादा भाग वेगळा होत नाही व ही जुळी चिकटलेली (चेंगयेंगासारखी) जन्माला येतात. अस्थिबंधनातून लीफ फ्लुइड एकातून दुसरीकडे जात असते. काही कुटुंबात ट्वीन्स होण्याचे प्रमाण जास्त असते. म्हणजे जुळी होण्याचे एक कारण आनुवंशिकता हे होय.

चेंग आणि येंग यांचे अस्थिबंधन छातीच्या मुख्य हाडाजवळ जोडलेले होते. ते जवळजवळ ८ इंच गोल होते ! ते किती दणकट होते याची कल्पना एका मजेदार प्रसंगावरून येईल.

हे बंधुद्वय एकदा पलंगावर झोपले असताना एक खाली पडला ! खाली पडला म्हणण्यापेक्षा तो अस्थिबंधनावर संपूर्णपणे लोंबकळत राहिला ! काही सेकंदानंतर त्या दोघांना जाग आली त्या वेळेला कुणालाही वेदना झाल्या नाहीत.

स्त्रियांना दोन अंडाशय (ovaries) असतात. एक डावीकडे व दुसरे उजवीकडे. दरमहा पाळी येते त्या वेळेला त्यातील एका अंडाशयातून एक स्त्री–बीज बाहेर पडते. दुसऱ्या महिन्यात पाळी आली की दुसऱ्या अंडाशयातून एक स्त्रीबीज बाहेर पडते. हे दोन अंडाशय असे आळीपाळीने काम करीत असतात; पण कधीकधी एकाच अंडाशयातून दोन किंवा दोन्ही अंडाशयांतून दोन किंवा जास्त स्त्रीबीजे बाहेर पडतात. असल्या वेळी जुळी किंवा इतर बहुगुणित जन्म (mutiple births) होतात.


## ग्रंथप्रेमासाठी 'फिनिक्स'ची
## – जाहिरात –

● विचार मांडण्यासाठी ग्रंथाइतके उत्कृष्ट माध्यम कोणतेच नाही. पुस्तकांची किंमत छापील किंमतीपलीकडे असते. म्हणून वाचनालयाचे पुस्तक परत करण्यास चुकू नका. पुस्तके निष्काळजीपणे वापरणारा व पुस्तके परत न करणारा वर्गणीदार पैसे बुडविणाऱ्या वर्गणीदारापेक्षा अधिक दोषी ठरतो.

- पुस्तके हाताळण्यापूर्वी हात स्वच्छ असल्याची खात्री करून घ्या.
- पाने उलटताना ती काळजीपूर्वक उलटा.
- पुस्तकात कोणतीही वस्तू ठेवू नका.
- खुणेसाठी पुस्तकांची पाने दुमडू नका.
- पुस्तक वाचून झाल्यावर ते उन्हात अगर धुळीच्या जागी ठेवू नका.
- लहान मुलांपासून पुस्तके दूर ठेवा.
- उघडें पुस्तक पालथे ठेवू नका.
- कोणताही पदार्थ खाताना किंवा पिताना पुस्तक वाचू नका.

**दि फिनिक्स लायब्ररी**
**७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०**

कधीकधी सायामीज जुळयांना जोडणारे अस्थिबंधन शरीराचा एक अनावश्यक भाग (vestigial organ) बनू शकतो. आपल्या शरीरातल्या कण्याच्या शेवटी कॉक्सिक्स (coccyx) हा शेपटाचा vestigial अवयव आहे. मानवाचे शरीर जुळवाजुळवी (adaptability) करण्यात इतके पटाईत असते की कोणत्याही प्रसंगासमोर लढण्याची त्याची कार्यक्षमता अचाटच असते. सायमीझ जुळी हळूहळू मोठी झाली की, त्याच्या शरीराचा कारभार व्यवस्थित चालू लागतो. त्यांना जोडणाऱ्या अस्थिबंधनात जर फारशा ब्लड व्हेसल्स नसल्या तर त्या जुळयांना शस्त्रक्रिया करून वेगळे करणे अवघड होत नाही; परंतु चेंग-येंगला जोडणारे अस्थिबंधन छाती व पोटाच्या मधे होते व त्यात बऱ्याच रक्ताच्या व्हेसल्स होत्या. शिवाय वैद्यकीय शास्त्रही त्या वेळेला इतके प्रगत झाले नव्हते.

लहानपणी त्या दोघांचे रक्त निश्चितच एकाकडून दुसऱ्याकडे जात असेल. म्हणजे एकाला जर इन्फेक्शन तर दुसऱ्याला सुद्धा !

मार्च १९७८ च्या बुक–डायजेस्टमध्ये या अस्थिबंधनाचे फोटो बरेच स्पष्ट दिले आहेत. स्लीव्हलेस कपड्यासाठी हाताला जसे भोक ठेवावे लागते तसे या अस्थिबंधनाभोवती चेंग व येंगच्या शिंप्याला भोक ठेवावे लागे ! हे अस्थिबंधन सुरुवातीला फार आखूड होते; पण लहानपणी चेंग व येंग टेकडीवरून मजेसाठी लोळत–लोळत, घरंगळत–घरंगळत खाली येत त्यामुळे त्यांचे अस्थिबंधन लवचिक व मोठे झाले व त्यांना एक काकणभर जास्त स्वातंत्र्य मिळाले !

चेंगला व येंगला सुरुवातीला धड चालता सुद्धा येत नव्हते. ज्यांनी त्यांना तसे चालताना पाहिले होते ते असे म्हणत होते की, जशी दोन मद्यपी माणसे झिंगून चालतात तसेच ते आधी चालत होते. पुढे सरावाने त्यांच्या हालचालीत एकसूत्रता आली. ती इतकी की, हे जखडलेले जुळे पोहू लागले. एकदा तर ते हेलकावे घेत असलेल्या बोटीच्या mast (ताड, शीडकाठी) वर चढले होते ! या दोघांना वेगळे करण्यासाठी त्यांना एका तारेवर घोड्याच्या जीनसारखे टांगून ठेवावे असे एकाने सुचवले !

या पहिल्या जिवंत सायॅमीज ट्वीन्सना एका युरोपियनाने पाश्चात्य देशात प्रेक्षणीय व्यक्ती म्हणून नेल्या. बरीच वर्षे या दोघांना पी. टी. बारनमच्या सर्कशीत सुद्धा दाखविण्यात आले. सुदैवाने या दोघांतील एक स्वभावाने तिरसिंगराव तर दुसरा स्वभावाने अति थंड व संथ होता ! मला असे सांगायचे आहे की, जगातले कोणतेही आदर्श प्रेमी युगुल चेंग आणि येंगप्रमाणे ६३ वर्षे जखडलेल्या अवस्थेत राहू शकणार नाही !

अलीकडे मी एका महागड्या मासिकाची काही वर्षांची वर्गणी भरली होती. (सध्याची न्यूजवीकची वर्गणी तुम्हाला माहीत आहे का? तीन वर्षांची रु १०९२=०० ! एखाद्या धाडसी संपादकाने "टाईम", "न्यूजविक" चे मराठीकरण करून १/१० वर्गणी ठेवून महाराष्ट्रभर भरपूर खपवावे). या महागड्या मासिकाचे नाव आहे, "बुक डायजेस्ट.". याचे आत्तापर्यंत माझ्याकडे ३ अंक आले. या "बुक डायजेस्ट" मध्ये भरपूर छायाचित्रे तर आहेतच; परंतु थोडक्यात बेस्टसेलर पुस्तकांची माहिती पण आहे. शिवाय हा अंक पुस्तकाच्या आधीच येतो. अंकाची गुणवत्ता बघून पटते की हा अंक महाग नाही. शिवाय अंक जुना झाला की त्यातली कात्रणे व छायाचित्रे मूळ पुस्तकाला लावली की भरपूर माहिती मिळेल.

—जे. एन्. पोंडा
दि फिनिक्स लायब्ररी

**चक्रव्यूहात अडकलेले दादा मंत्रिमंडळ : पृष्ठ ८ वरून**

की, पुणे जिल्हा कांग्रेस कमिटीने तिडके यांच्याकडे. अध्यक्षपदाच्या राजीनाम्याची मागणी केली. या बैठकीत सरचिटणीस गोविंदराव आदिक हजर होते. त्यामुळे त्यांची संमती असल्याशिवाय राजीनाम्याची मागणी होणार नाही असे तिडके यांना वाटते. त्यातच हा संयुक्त दौरा ठरविला गेला. आपल्या विरुद्धची मोहीम म्हणून हा संयुक्त दौरा केला जात आहे असा संशय तिडके यांना आला म्हणून त्यांनी तो रद्द केला.

प्रदेश कांग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र तिडके यांनी सरचिटणिसांचा संयुक्त दौरा संशयामुळे रद्द केला, तेवढ्यावरच ते थांबले असे नाही. नरेंद्र तिडके यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबरही संयुक्त दौरा करण्यास तयार झाले नाहीत.

६ जून १९७८ रोजी प्रियरंजनदास मुन्शी नगर, नागपूर व औरंगाबाद या तीन ठिकाणचा दौरा करणार आहेत. नगरच्या दौऱ्यात प्रियरंजनदास मुन्शी, यशवंतराव चव्हाण व नरेंद्र तिडके यांचा संयुक्त कार्यक्रम ठेवावा अशी चर्चा करण्यात आली होती.

**'यशवंतराव चव्हाण व माझे विचार यात फरक आहे. त्यांची मते मला मान्य नाहीत. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर मी एका व्यासपीठावरून बोलणार नाही. त्यामुळे यशवंतरावांबरोबर मला संयुक्त दौराही करता येणार नाही' असे नरेंद्र तिडके म्हणाले. यशवंतराव चव्हाण कांग्रेसचे हंगामी अध्यक्ष आहेत. त्यांच्याबरोबर आपण संयुक्त दौरा करणार नाही असे नरेंद्र तिडके म्हणतात ही बाबच महाराष्ट्र कांग्रेस कशी दुभंगणार आहे याची कल्पना देण्यास पुरेशी आहे.**

संयुक्त सरकारला कांग्रेसची मान्यता मिळाली. काही महिने हे सरकार चालले. त्याचबरोबर एकीकरणाचे प्रयत्नही जोरात सुरू केले गेले. हे समजण्यासारखे आहे; पण नंदीहिल्स येथे कांग्रेस आयच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावण्यात आली होती. तिला हजर राहण्याचे निमंत्रण मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांना पाठविले होते. सिद्धार्थ शंकर रे यांनी सांगितले नसते तर दादा नंदीहिल्सला गेलेही असते ! दुसऱ्या पक्षाच्या बैठकीला जाण्याची मानसिक तयारी दादांनी केली होती. यावरून दादांना एकीकरणाची किती घाई आहे हे दिसून येते !

## एकमेकांत गुंतलेली चाके

महाराष्ट्रात एकीकरण घडवून आणले की यशवंतराव चव्हाण यांचा पाया ढासळणार आहे असे श्रीमती गांधी मानीत आहेत; परंतु ते खरे ठरणार नाही असे १५–१६ मे च्या मेळाव्यातील भाषणावरून दिसते. या मेळाव्यामध्ये यशवंतरावांनी जे भाषण केले त्याला इतर प्रांतांतील कांग्रेसजनांनी पाठिंबाच दिला असे नव्हे तर यशवंतरावांच्याच भाषणाचा सूर त्यांनी लावला होता. यामुळे भारताच्या सर्व भागातील कार्यकर्ते यशवंतरावांच्या बरोबर आहेत असे दृश्य तरी दिसते. म्हणजे महाराष्ट्रात यशवंतरावांचा पाया खचला तर अखिल भारतीय पातळीवर आपल्याला विरोध करणारी शक्ती कांग्रेसमध्ये राहणार नाही या इंदिरा गांधी यांच्या कयासाला धक्का बसेल ! इंदिरा गांधी महाराष्ट्रातील संयुक्त सरकारचा कशासाठी वापर करू पाहात आहेत हे यावरूनही स्पष्ट होते. त्यामुळेच कांग्रेसचे एकीकरण व महाराष्ट्रातील संयुक्त सरकार हे विषय वेगवेगळे वाटत असले तरी यंत्राची दोन चाके एकात एक जशी एकमेकाला जोडलेली असतात तसेच हे दोन विषय एकमेकांशी जोडले गेले आहेत ! याच कारणामुळे एकीकरण व महाराष्ट्रातील संयुक्त सरकारचे भवितव्य यांचा एकत्र विचार केला आहे. एकीकरण झाले तरी यशवंतराव चव्हाण यांना मानणारा गट महाराष्ट्र कांग्रेसमध्ये राहणार आहे. तो हा गट अ. भा. कांग्रेसबरोबर जाईल. एकीकरणाला या गटाने जोरदार विरोध केला व एकीकरणवाद्यांचे प्रयत्न हाणून पाडले तरी एकीकरणवादी कांग्रेसबरोबर राहण्यापेक्षा इंदिरा कांग्रेसमध्ये जाणे अधिक पसंत करतील. यापैकी कोणतीही घटना घडली तरी त्यांचे पडसाद संयुक्त मंत्रिमंडळामध्ये उमटून त्याचे अस्तित्व धोक्यात येणार आहे. □

पुण्यात नुकताच हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्थांचा एक मेळावा पार पडला. त्या निमित्ताने....

# बाबांनो, चर्चा खूप झाल्या. काही तरी करा रे!

अजित सातभाई

गेल्या ५-६ वर्षांमधे मराठी रंगभूमीवर प्रायोगिक नाटकांचे उदंड पीक आलेले आहे. अक्षरशः शेकडो सुशिक्षित तरुणतरुणी, नाटक या माध्यमाकडे आकर्षिले जात आहेत आणि हे आकर्षण फक्त पुणे आणि मुंबई यांच्यापुरतेच मर्यादित नाही तर नागपूर, नाशिक, कोल्हापूर, सांगली, लातूर, जळगाव, बार्शी इ. सर्व महत्त्वाच्या गावात आहे. या आकर्षणामुळे आणि त्यातूनच निर्माण होणाऱ्या प्रेमामुळे अनेक नवनवीन हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्था निघत आहेत. नवनवीन प्रयोग करीत आहेत. पुण्यात आणि मुंबईत निर्माण झालेल्या काही नाटकांनी तरी (उदा० घाशीराम कोतवाल, शांतता-कोर्ट चालू आहे इ० ) मराठी रंगभूमीच्या प्रगतीच्या संदर्भात महत्त्वाच्या टप्प्याचे स्थान मिळविले. मुंबईच्या छबिलदास चळवळीमुळे हौशी आणि प्रायोगिक नाटकांना त्यांना पाहिजे असाच एक रंगमंच उपलब्ध झाला आहे; पण सध्या या वाढीमुळे हौशी आणि प्रायोगिक क्षेत्रात एक प्रकारचा तोचतोपणा जाणवू लागला आहे. प्रायोगिक नाटक म्हणजे प्रेक्षकांच्या दृष्टीने कंटाळवाणे आणि बोअर नाटक अशी व्याख्या दृढ होत आहे. योग्य नाट्यशिक्षणाच्या अभावी वैयक्तिक अभिनयसामर्थ्य असलेले नट हळूहळू कमी होत आहेत; नवीन खऱ्या मराठी नाटकांची वाण आहे. एवढेच नाही तर अनेक नाटकात विषयाचा तोचतोपणा जाणविण्याइतका आहे. पाश्चात्य संस्कृतीचा नको इतका प्रभाव; लेखकांच्या आणि नटांच्या भाषासामर्थ्याचा अभाव इत्यादि कारणांमुळे, हौशी आणि प्रायोगिक नाटक हे प्रेक्षकांना दुराग्रही, दुर्बोध आणि दुःसह झाले आहे.

पुण्याच्या भरतनाट्य संशोधन मंदिर या सर्वांत जुन्या हौशी संस्थेच्या, अनंत कुलकर्णी या तरुण आणि तडफदार कार्यकर्त्याने त्याच्या सहकाऱ्यांसमवेत विचार करून, पुण्यातल्या व पुण्याबाहेरच्या हौशी आणि प्रायोगिक रंगमंचावर काम करणाऱ्या सर्व संस्थांना आणि व्यक्तींना एकत्र आणण्याची योजना केली व एक मेळावा नुकताच पार पाडला.

आदर्श हौशी नाट्यसंस्थेने प्रायोगिक नाट्यनिर्मितीबरोबरच इतर अनेक प्रकारची कार्ये करणे आवश्यक आहे. नाट्यशिक्षणाची सोय, रंगभूमीविषयक साहित्यप्रसिद्धी, नाट्यलेखन संदर्भात काही शैक्षणिक कार्ये, पूरक कलांच्या शिक्षणाची सोय आणि त्या संस्थांनी रंगभूमी एक चळवळ म्हणून पुढे नेली पाहिजे. सध्या रंगभूमीवर काम करणाऱ्यांना Basic Theatre knowledge देणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. या नियोजित मेळाव्यात हौशी रंगमंच आणि प्रायोगिक रंगमंच यांच्या संदर्भात या दृष्टीने विचार व्हावा अशी अपेक्षा होती:

हौशी प्रायोगिक नाट्यसंस्थांचे संघटन आणि व्यवस्थापन, नाट्यस्पर्धा : आजचे स्वरूप, प्रायोगिक रंगभूमी : वस्तुस्थिती, अपेक्षा या तीन विषयांवर चर्चासत्रे हा या मेळाव्याचा मुख्य कार्यक्रम होता. महापुरुष या नाटकाचा आणि राजाचा खेळ, आम्ही जमदग्नी प्रेतरूपी या एकांकिकांचे प्रयोग आणि त्यावर चर्चा यांचेही आयोजन मेळाव्यात होते.

वर सांगितलेली या मेळाव्याची संकल्पना पहाता खूप काही तरी पदरात पडेल अशी अपेक्षा होती; परंतु खरोखरीच पदरात काय पडले ?

हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्थांचे संघटन व व्यवस्थापन या चर्चासत्रात मुंबईच्या अरुण काकडयांनी एक सविस्तर टिपण वाचून दाखविले. त्यांनी एक महत्त्वाचा विचार असा मांडला की, नाटक हे प्रेक्षकांसाठी असते म्हणून प्रायोगिक लोकांनी प्रेक्षकांशी संवाद करणे आवश्यक आहे. 'छबिलदास'सारख्या रंगमंचामधून हे घडू शकते. प्रायोगिक संस्थांनी आपआपला प्रेक्षकवर्ग तयार केला पाहिजे. (पुण्यात २२ हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्था आहेत; परंतु फक्त पाच-सहाच संस्था खऱ्या अर्थाने काम करीत आहेत. )

हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्था एकाच व्यक्तीच्या उर्मट अहंकाराभोवती उभी रहाते अशी जोरदार सुरुवात ग. बा. बेहऱ्यांनी केली. संस्था टिकणे हे फारसे महत्त्वाचे नाही. नाट्यसंस्थांचा 'फुटणे' हा सर्वांत महत्त्वाचा गुण आहे; पण त्यामुळेच वेगवेगळया प्रकारची नाट्यनिर्मिती होते, निरनिराळे कलाकार पुढे येत रहातात. बेहऱ्यांनी असेही सांगितले की प्रायोगिक नाट्यसंस्था आर्थिकदृष्टया कमकुवतच असावी; कारण त्यामुळेच कार्यकर्त्यांना काम करायला हुरूप आणि चैतन्य येते. याच ठिकाणी चर्चेमध्ये एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित झाला की अशा प्रायोगिक संस्थांनी आपले एखादे नाटक आर्थिक दृष्टया यशस्वी होत असेल तर ते तसेच पुढे चालवावे का सरळ बंद करून व्यावसायिकांच्या ताब्यात द्यावे ? नाट्यसंस्थांच्या संदर्भात 'अर्थशास्त्र' हे सर्वांत महत्त्वाचे; पण त्याचा उल्लेख प्रथम होण्याऐवजी जागेची अडचण, चांगल्या स्त्रीकलाकारांचा अभाव, रेकॉर्डिंगची गैरसोय हे इतर ठिकाणी वारंवार चर्चिलेले मुद्देच परत येत होते. ग. बा. बेहऱ्यांनी सांगितले की हौशी आणि प्रायोगिक रंगभूमीकडून उधळपट्टीची, डामडौलाची अपेक्षा नाही. ते काम व्यावसायिकांचे. बालगंधर्व अत्तराची अंघोळ करून रंगभूमीवर येत; पण त्या खर्चिक अंघोळीचा रंगभूमीला काय उपयोग ?' या उदाहरणाच्या तुलनेमध्ये लातूरच्या राजा म्हैसकरांनी सांगितलेली एक कथा फार काही सांगून गेली. त्यांच्या नाट्यसंस्थेने दुरुस्तीसाठी एक टेपरेकॉर्डर मुंबईला पाठ-

विला डिसेंबर ७७ मध्ये. त्याचे दुरुस्तीचे बिल झाले ४५० रु.; पण त्यांची संस्था एवढेही पैसे गोळा करू शकत नसल्याने अजूनही तो टेपरेकॉर्डर मुंबईच्या दुकानातून ते सोडवून आणू शकले नाहीत ! सत्यदेव दुबे म्हणाले की जास्त पैसा आल्यावर त्या पैशाचे करायचे काय ? हा प्रश्न त्यांना पडला आणि त्यांनी एक लाख रुपयांचे अनुदान नाकारले. (हा बाणेदारपणा म्हणायचा का वस्तुस्थितीचे भान म्हणायचे, का निर्मितीची असमर्थता ? हा प्रश्न वेगळा) बहुमत असे झाले की प्रायोगिक संस्थेचे एखादे नाटक चालले तर त्यांनी ते चालवावे. मात्र त्याचा फायदा हा चैनीसाठी न वापरता नवीन प्रायोगिक नाटकांच्या निर्मितीसाठीच वापरावा. श्रीमंत नाटचसंस्थांनी हुशार दिग्दर्शकाला, लेखकाला नवीन प्रायोगिक नाटकांच्या निर्मितीसाठी अर्थसहाय्य करावे; असाही विचार मांडण्यात आला. प्रायोगिक नाटकांना पुष्कळ रंगमंच उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक केंद्रांच्या वाढीची आणि विकेंद्रीकरणाची आवश्यकता श्रीधर राजगुरूंनी सांगितली. नाटचसंस्थाच असावी काय ? एका संस्थेच्या कलाकारांनी दुसऱ्या संस्थेच्या नाटकात कामे करावी काय ? इत्यादी मुद्देही चर्चिले गेले; पण हौशी आणि प्रायोगिक रंगभूमीसाठी काम करणारी व्यक्ती ही एक 'मिशनरी' असावी, आकर्षक आर्थिक लाभांकडे आणि कीर्तीकडे दुर्लक्ष करून आपले काम तिने सातत्याने चालू ठेवावे आणि हीच रंगभूमीच्या गुणात्मक वाढीची नितांत गरज आहे हा मुद्दा साफ दुर्लक्षिला गेला. चर्चेचे सूत्रचालन केलेल्या, गेल्या पाव शतकाहूनही अधिक काळ एक हौशी आणि प्रायोगिक नाटचसंस्था समर्थपणे चालविणाऱ्या भालबा केळकरांनी याविषयी मला काहीही बोलायचे नाही ' असे सांगून ही चर्चा संपविली.

नाटचस्पर्धा – आजचे स्वरूप, अपेक्षा या चर्चासत्रात मुख्य चर्चा राज्य-नाटच स्पर्धेवरच केंद्रित होणे स्वाभाविक होते. त्यात गेली २३ वर्षे लातूरसारख्या गावातून हौशी रंगभूमीवर निष्ठेने काम करणाऱ्या राजा म्हैसकरांनी आपले विस्तृत टिपण वाचून दाखविले. त्यांनी केलेली एक सूचना फार लक्षणीय होती. ते म्हणाले, नागरी आणि अनागरी असा भेद यापुढे न ठेवता उच्चस्तरीय, मध्यम स्तरीय व नीच स्तरीय अशा तीन प्रकारच्या स्पर्धा ठेवाव्यात आणि मुंबई पुण्याच्या नाटचप्रयोगांना उच्च स्तरातच सामील करावे. तसेच अंतिम स्पर्धा न घेता प्रादेशिक स्पर्धाच त्या विशिष्ट विभागापुरत्या अंतिम असाव्यात.परीक्षकांची निवड हा कायमचा डोकेदुखीचा प्रश्न अनेक वक्त्यांनी उपस्थित केला. शेवटी कलासंचालनाचे संचालक दामू केंकरे अगतिकपणे म्हणाले. की, तुमच्या दृष्टीने परीक्षकाला आवश्यक असलेले गुण कोणते ते सांगा व त्या गुणांच्या कसोटीला उतरणारे परीक्षक कोणते त्यांचीही यादी माझ्याकडे पाठवा. मुंबईचे पत्रकार आणि टीकाकार श्री. कमलकार नाडकर्णी यांनी स्पष्ट सांगितले, की पुणे आणि मुंबई इथल्या प्रथितयश नाटचसंस्थांनी राज्य-नाटचस्पर्धेत भाग घेणे बंद करावे आणि प्रायोगिक रंगभूमीसाठी वेगळचा प्रकारे भरीव काम करण्यास सुरुवात करावी.

एकच नाटचप्रयोग स्पर्धेसाठी तयार करावा व तो सर्व स्पर्धकांना सादर करायला लावावा. दोन-तीन वर्षे तेच परीक्षक ठेवावेत म्हणजे कलाकारांची किती वाढ झाली हे ते सांगतील. अशा प्रकारच्या काही बालिश सूचनाही या सत्रात करण्यात आल्या.

राज्य–नाटचस्पर्धेच्या दृष्टीने निश्चित अशा भरीव सूचना या चर्चासत्रातून बाहेर आल्या नाहीत तरी सुद्धा पुढे विचार करण्याच्या दृष्टीने ही चर्चा उपयोगी पडो! अशी आशा व्यक्त करून दामू केंकऱ्यांनी हे चर्चासत्र संपविले.

प्रायोगिक रंगभूमी, वस्तुस्थिती, अपेक्षा हे या मेळाव्यातले सर्वांत महत्त्वाचे चर्चासत्र. अरविंद देशपांड्यांनी याचे सूत्रचालन केले. वृंदावन दंडवत्यांच्या समग्र टिपणाने या चर्चासत्राची सुरुवात झाली. कलेचा संबंध सरळ माणसाशी यावा, तोच खरा कलेचा केंद्रबिंदू असतो. शिल्प, नृत्य, चित्र, संगीत या पूरक कलांचे ज्ञान करून घेणे हे रंगभूमीवरच्या कलाकाराला आवश्यक आहे. खरे नाटच केवळ शब्दातूनच व्यक्त होते असे नाही. हे महत्त्वाचे विचार त्यांनी मांडले.

प्रस्थापित चौकटी मोडून नवीन रचनेची आणि आशयाची निर्मिती अशी प्रायोगिक रंगभूमीची व्याख्या प्रा. वि. भा. देशपांड्यांनी केली. प्रायोगिक रंगभूमीवरून लुप्त होत असलेल्या वैयक्तिक अभिनयसामर्थ्याबद्दल त्यांनी चिंता प्रकट केली.

तरुण पिढीचे प्रतिभाशाली नाटककार महेश एलकुंचवार यांनी सात-आठ मिनिटांचेच वक्तव्य केले, पण या चर्चेस खरी सुरवात केली त्यांनीच. आज महाराष्ट्रात जिवंत नाटक नाही. आजची रंगभूमी ही नुसती कात आहे. आपण प्रायोगिकतेचे बंड-बंड म्हणून जे ओरडतो ते तसे खरोखरीचे बंड नाही. आपण वास्तव जीवनात करतो त्या तडजोडी, पारंपारिक वागणूक आणि रंगभूमीवर करू इच्छितो ते बंड, यात खूप विसंगती आहे. संपूर्ण जीवनातच क्रांती झाल्याशिवाय रंगभूमीवर चैतन्यशील प्रायोगिकता येणे अशक्य आहे. रंगभूमी हा जीवनाचा फारच छोटा भाग आहे. या विसंगतीमुळे नाटक नष्ट झाले तर मला सुख:दुख नाही. मी गुलाबाची झाडे लावीन आणि हौसेने ब्रिज खेळायला जाईन, या सडेतोड भाषणावर सतीश आळेकर आवेशाने पुढे आले. ते म्हणाले महेशचे फ्रस्ट्रेशन मला मान्य नाही. महेश म्हणतो ते बंड किंवा क्रांती यांचा रंगभूमीशी संबंध कसा जोडता येईल ? आम्हाला जे पाहिजे ते आम्ही लिहितो. आम्ही सदाशिव-शनिवारवाले काय घंटा क्रांती करणार ? दलित लोक जे नाटचप्रयोग करतात त्याला बंड किंवा क्रांती म्हणा. आळेकरांनी खळबळच उडविली. त्यांच्या या विधानावर ज.वा. बेहेरे तुटूनच पडले. शनिवार नारायणमधल्या टिळक – आगरकरांनीच समाजक्रांती केलेली आहे. जी वैचारिक आणि सामाजिक क्रांती होते ती मुख्यत: मध्यमवर्गच करतो. कारण ती रक्तहीन असते. दंगली आणि रक्तपात यांना अराजक म्हणतात, क्रांती नाही. रंगभूमी हा वैचारिक आविष्कार आहे. दलित काय किंवा मध्यमवर्गीय काय सर्वांनीच तो खुला आहे.' अर्थात या वादविवादामुळे एक भलताच मुद्दा उपस्थित झाला होता की हा मेळावा काय शनिवार-नारायणवाल्यांचा आहे काय ? परंतु 'सदाशिव-शनिवार' ही आमच्या संकुचित जीवनाचे वर्णन करणारी 'फ्रेज' आहे. त्याचा भलता अर्थ लावू नका असे आळेकरांनी स्पष्ट केल्यावर हा वाद

संपला. या चर्चेत पुढे अच्युत वझ्यांनी प्रायोगिक रंगभूमीवरचे भावविश्व नष्ट होत असल्याची चिंता व्यक्त केली.

जब्बार पटेल यांनी वैयक्तिक कष्ट घेण्याचा डॉ. लागू, शंभू मित्रा इत्यादिकांच्या यशाचा शोध घेण्याचा सल्ला नवोदितांना दिला तरीपण पटेलांनी घेतलेला पालकत्वाचा अभिनिवेश (Patronising Attitude) जरा खटकलाच. येती सहा वर्षे तरी सामूहिक नाट्य प्रायोगिक रंगभूमीवर न करण्याचा ठराव आपण करू या हे त्यांनी थोडचाशा गमतीने केलेले विधान अनेकांना सतावून गले.

प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात त्र्यं. वि. सरदेशमुखांनी एक फार मौलिक प्रश्न प्रायोगिकवाल्यांना विचारला. 'कीर्तन, तमाशा, भारूड इत्यादि लोककलांचा उपयोग आपण रंगभूमीवर करतो ,पण या फॉर्ममधून आपण जे आपले आधुनिक आशय, विचार रंगभूमीवर मांडीत आहोत ते त्या फॉर्मशी सुसंगत आहेत का? फॉर्म आणि आशय यांची फारकत तर आपण करीत नाही ना? नाटक ठसते ते फॉर्मच्या प्रभावामुळे का आशयामुळे याचा प्रायोगिकवाल्यांनी काही विचार केला आहे का? दुर्दैवाने हा त्यांचा मुद्दा संपूर्णपणे दुर्लक्षिला गेला.

समर नखातेंनी शिबिरासारख्या नाट्यशिक्षणातून अभिनयातील जिवंतपणा नष्ट होत असल्याची भीती व्यक्त केली. तसेच शहरी लोकांनी अनागरी भागात जाऊन आपल्या प्रायोगिक कल्पना त्यांच्यावर लादू नयेत अशीही अपेक्षा व्यक्त केली. या त्यांच्या विचाराला नाटककार दिलीप जगतापांनी नागरी–अनागरी वादाचे स्वरूप देण्याचा विनाकारणच प्रयत्न केला. 'शहरातून येऊन आम्हाला शिकवू नका! तुमचे झेंडे आमच्या इथे फडकवू नका! आम्ही आमचे समर्थ आहोत!' अशा प्रकारची आक्रमक पण उथळ विधाने केली. यावर सतीश आळेकरांनीही त्यांना निक्षून सांगितले की, आम्ही कोणते नाटक करावे याचे जसे स्वातंत्र्य आम्हाला आहे त्याचप्रमाणे कोणापुढे हे नाटक करावे याचेही स्वातंत्र्य आम्हाला आहेच!

माणसाचा शोध घेण्यासाठीच साहित्यिक बंड करतो. परंपरागत माणूस, आजूबाजूचा माणूस आणि आतला माणूस यांचा शोध यात प्रायोगिकतेचे मर्म आहे. आजच्या बदलत्या युगात प्रायोगिक रंगमंचावरल्या लोकांनी अशा सूत्राने रंगभूमीच्या जाणीवकक्षा विस्ताराव्यात अशी अपेक्षा ग. वा. बेहेरे यांनी व्यक्त केल्यावर हे चर्चासत्र संपले आणि हा मेळावासुद्धा संपला.

तीन दिवस चाललेल्या मेळाव्याने खरोखरच रंगभूमीसंबंधी काय नवीन दिशा दाखविल्या हा प्रश्नच आहे. हौशी आणि प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात मोलाचे काम केलेल्या भालबा केळकर, आत्माराम भेंडे, दामू केंकरे, अरविंद देशपांडे, जब्बार पटेल यांची उपस्थिती काही घडवू शकली का? अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर संपूर्ण मेळाव्यास सुरुवातीपासून शेवटपर्यंत उपस्थित होते; पण 'मी एक निरीक्षक म्हणून आलो आहे' असे सांगून त्यांनी कुठल्याही चर्चेत भाग घेतला नाही. प्रकर्षाने एकच जाणवत होते की, कारणपरत्वे नाटकसिनेमा–व्यवसायाशी संबंधित असलेली मंडळी फारच गोलगोल विधाने करीत होती तर अजून तरी संपूर्ण हौशी प्रायोगिक असलेली टोकाची विधाने करीत होती. या संदर्भात मुंबईच्या सत्यदेव दुब्यांनी तर वेगळेच टोक गाठले. सभा जिंकावी कशी व इतर वक्त्यांना आक्रमक भाषणाने कसे नामोहरम करावे याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी दिला; पण उत्कृष्ट वक्तृत्वामुळे निर्माण होणाऱ्या चैतन्यापलीकडे ते जास्त काही देऊ शकले नाहीत.

'महापुरुष' या नाट्यप्रयोगावर आणि आम्ही जमदग्नी प्रेतरूपी या एकांकिकेवर चर्चेमध्ये जे हल्ले झाले ते अक्षरशः युद्धपातळीवरचे होते. 'या लोकांना नाटकासाठी कुणी बोलावले?' 'नाट्यक्षेत्रात ही मंडळी अजून बालक आहेत.' 'हे नाटक लिहिण्याच्या फंदात कशाला पडला?' 'लहान मुलाला कुठल्याही पुस्तकातून कुठलीही दहा पाने फाडायला सांगा म्हणजे जे स्क्रिप्ट तयार होईल तीच ही एकांकिका.' 'या एकांकिकेतल्या लोकांना साधे धड उभेही रहाता येत नाही. त्यांनी उभे रहाण्यापासूनच शिक्षणाला सुरुवात करावी!' अशा प्रकारची अनेक विधाने चर्चेत केली गेली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात, विशेषत: नाट्यक्षेत्रात जो एक 'विनाकारण भांडखोरपणा' आहे त्याचे नमुनेदार दर्शन इथे घडले. ठीक आहे, त्या कलाकारांनी नाट्याविष्कार निकृष्ट केला; पण मग मेळाव्यातल्या लोकांकडून ते काही साधेसुधे नाहीत. तर अनेक गाजलेले दिग्दर्शक, लेखक, अभिनेते, टीकाकार असे लोक. मार्गदर्शनाची,Creative मार्गदर्शनाची अपेक्षा होती. बौद्धिक आणि चमकदार चर्चा अनेकजण करतात आणि खूपजण करूही शकतील; पण नाट्यकलेमध्ये आविष्कारालाच सर्वाधिक महत्त्व. कारण 'संहितेचा आविष्कार' हे 'Creation' झाल्याशिवाय नाटक पूर्ण होत नाही. नट, नाटककार, दिग्दर्शक त्यांचे व्यक्तिमत्त्व ओततो ते आविष्कारात, त्या आविष्कारासंबंधीच अशी टिंगलटवाळी 'प्रायोगिक' लोकांकडून अपेक्षित नव्हती. Creative followup असल्याशिवाय कुठल्याही नाट्यमेळाव्याची, शिबिराची कल्पना व्यर्थ आहे. या मेळाव्यानंतर Creatisve followup ची अपेक्षा करावी काय? प्रश्नच आहे. अखेर या मेळाव्यात काय घडले? चार ठिकाणांहून चार बुद्धिमान कलाकार आले आणि आपल्या बुद्धीचे, विचारांचे, कंगोरे दाखवून परत गेले. प्रायोगिक रंगमंच बिचारा तसाच राहिला. मेळाव्याच्या शेवटी शेवटी दामू केंकरे म्हणाले तेच सर्वात महत्त्वाचे. 'बाबांनो, चर्चा खूप झाल्या. काही तरी करा रे!' □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

रंगभूमी । विनया खडपेकर

# पंडित, आता तरी शहाणे व्हा !

मध्यमवर्गीय चाकोरीतली दृष्टी सोडून जीवनात वेगळ्या घडणाऱ्या घटनांचा उदार मनाने, हसतमुखाने, समंजसपणे स्वीकार केला पाहिजे हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

हा विषय श्री. पंडित यांच्या कौटुंबिक कथेतून 'पंडित, आता तरी शहाणे व्हा!' या नाटकात मांडला आहे. श्री. पंडित हे एक मॅट्रिक झालेले सामान्य कारकून. सौ. पंडित पदवीधर, स्वतः नोकरी करणारी, कष्टाळूपणे संसार करणारी, पतीची, मुलांची चिंता वाहणारी स्त्री. रेडकर हा सर्व सुख-दुःखांत साथ देणारा या कुटुंबाचा मित्र. जगन आणि सरोजिनी ही पंडितांची मुले ती हुषार आहेत, समंजस आहेत, शालीन आहेत. आईवडिलांवर प्रेम करणारी आहेत. तशीच स्वतंत्र बुद्धीने वागणारी, तत्त्वासाठी आईवडिलांशी संघर्ष स्वीकारणारी आहेत. सरोजिनी डॉक्टर होते. तिचा मालवणकरांच्या मुलाशी विवाह ठरतो. जगन एम. ए. पीएचडी. होतो. त्याला अमेरिकेची स्कॉलरशिप मिळते. श्री. आणि सौ. पंडितांच्या सुखाचा पेला काठोकाठ भरतो; पण तो ओठाला लागत नाही. अभ्यासानिमित्त झोपडपट्टीत काम करणारा जगन तेथील चळवळीत पडतो. त्याच्याबरोबर सरोजिनीही ओढली जाते. दोघेही तेथील कार्यकर्ता बंडा बंदरकर याच्याबरोबर त्या चळवळ करणाऱ्या वेलोसंघाचे काम करू लागतात. सरोजिनीने चळवळीत पडणे मालवणकरांना नापसंत असल्यामुळे तिचा विवाह मोडतो. श्री. आणि सौ. पंडित या धक्क्यातून सावरतात; पण चिंताग्रस्त होतात. आपल्या शहाण्यासुरत्या मुलांनी हे काय आरंभिले आहे ते त्यांना कळेनासे होते. प्रथम बंडा बंदरकर तुरुंगात जाणार, नंतर जगन, नंतर सरोजिनी असे ठरलेले असते. त्याप्रमाणे बंडा तुरुंगात जातो. चळवळीचे प्रकरण मंत्र्यापर्यंत जाते. जगन तुरुंगात जाण्यापूर्वीच मंत्र्याशी समेट होतो. जागा झोपडपट्टीला मिळते. बंदरकर सुटतो. श्री. आणि सौ. पंडित, मालवणकर एका फोनमुळे जिनीचे पुन्हा त्यांच्या मुलाशी लग्न होण्याचे स्वप्न पाहू लागतात. बंडा जिनीला मागणी घालतो. श्री. पंडित 'कोळी' म्हणून त्याचा उपमर्द करतात. जिनी घर सोडून जाते. रेडकरांकडे रहाते. या विवाहाला रेडकरांच्या प्रयत्नाने संमती मिळते. येथेच नाटक संपते.

नाटकाची प्रकृती वैचारिक विचारमंथनाची आहे. अनेक प्रकारचे विचार या नाटकात व्यक्त होतात. 'सोशल वर्क'संबंधी श्रीमंतांच्या, मध्यमवर्गीयांच्या कल्पना, झोपटपट्टीचे राजकारण, त्यांच्या एकगठ्ठा मतांशी मंत्र्यांचे हितसंबंध, कुमारिकांचे बाळंतपण, आंतरजातीय विवाह, परदेशात वास्तव्य करणाऱ्या मुलांच्या आईवडिलांचा प्रश्न, माओचे तत्त्वज्ञान त्याचा आमच्या मातीला काय उपयोग, हुंडाविरोधी मोर्चा, लग्नातल्या रोषणाईविरुद्ध मोर्चा म्हणजेच अन्यायाविरुद्ध झगडणे का अशा अनेक प्रश्नांना या नाटकाने स्पर्श केला आहे. त्यात आवश्यक ती एकसूत्रताही बऱ्यापैकी आहे; परंतु कोणत्याही विचारात लेखक खोलात शिरलेला नाही. यामुळे ताकदीचे नाटचबीज सापडूनही नाटक अतिशय उथळ, वरवरचे झाले आहे.

'विचार' हा गाभा असलेल्या या नाटकाची हाताळणी एखाद्या कथानकप्रधान नाटकासारखी आहे. घटनांच्या गर्दीत 'विचार' गुदमरून गेला आहे. पुष्कळदा प्रेक्षकांना हसविण्याच्या मोहाने नाटक मुख्य विषयापासून उगाच बाजूला जाते. मालवणकर येण्यापूर्वी पंडितला रेडकर देत असलेले ट्रेनिंग विनाकारण लांबविले आहे. सौ. पंडितांचे श्री. पंडितांना 'तुम्ही पोक काढू नका !' हे पुनःपुन्हा सांगणे अशाच रटाळ विनोदांपैकी. पहिल्या दोन अंकात लेखक शेवटी कोणता विचार देणार याची थोडी उत्सुकता निर्माण होते. ती तिसऱ्या अंकात अगदीच फोल ठरते तिसऱ्या अंकाचा शेवट अगदी सरधोपट असा-प्रेमी जोडप्याच्या विवाहाने होतो.

जीवनासंबंधी उलटसुलट विचार करायला लावणाऱ्या, जीवनातले सूक्ष्म संघर्ष दाखविणाऱ्या किती तरी जागा नाटकात आहेत; परंतु त्यांचा उपयोग योग्य रीतीने करून घेतलेला नाही. उदा. वेलोसंघाचे नेतृत्व करणारा जगन जेव्हा 'माओ म्हणतो तेच खरं' असे आवेशाने म्हणतो तेव्हाच त्याचा अनुयायी शिवा 'आमचं आणि कम्युनिस्टांचं पटत नाही' असे छातीवर हात ठोकून सांगत असतो. त्या वेळी त्याची तोंडची बडबडही कम्युनिस्ट कार्यकर्त्याला शोभण्यासारखीच आहे. झोपडपट्टीसाठी काम करणाऱ्या संघटना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणत्या तरी राजकीय पक्षाशी बांधलेल्या असतात. सामान्य कार्यकर्त्याला याची नीट जाणीव नसते; पण नेते त्यांना बरोबर स्वपक्षाच्या विचारधारेला लावतात. या सत्याचे अतिशय ओझरते दर्शन जगन आणि शिवा यांच्या उद्गारांतून होते. या 'ओझरत्या' उल्लेखामुळे ही विसंगती प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेऊ शकत नाही. सर्वच ठिकाणी जाणवणारे संघर्ष असे चुटपुटते आहेत.

श्री. आणि सौ. पंडित यांचे स्वभावरेखन सुरुवातीपासून शेवटपर्यंत सहजसुंदर झाले आहे. सुरुवातीला आनंदी आईवडील, नंतर धास्तावलेले, चिंताग्रस्त आईवडील, त्यांची मानसिक आंदोलने अतिशय सहजपणे नाटकात आली आहेत. बंडा बंदरकरशी गोडीने बोलणारा श्री. पंडित त्याने सरोजिनीला मागणी घालताच एकदम बिघडतो. 'अं ! तुम्हा कोळी' 'करतील तर काय कौतुक—ब्राह्मणाची डॉक्टर मुलगी आयती त्यांच्या घरात चालत जाती आहे.' या प्रतिक्रियांतून खास मध्यमवर्गीय ब्राह्मणी वडिलांची मूर्ती साकार झाली आहे. लेकीच्या आंतरजातीय विवाहाला शेवटपर्यंत तो मनःपूर्वक संमती देत नाही, केवळ नाइलाजाने होकार देतो असे दाखविण्यात लेखकाचे वास्तवाचे भान दिसते. सरोजिनीच्या विवाहाला मनःपूर्वक मान्यता देणारी, खिडकीतून तिच्याकडे कौतुकाने पाहणारी, तिला आलिंगन देणारी

आई–सौ. पंडित हीसुद्धा तितकीच वास्तव वाटते त्यामानाने श्री रेडकर, जगन, सरोजिनी यांच्या व्यक्तिरेखा ढोबळ वाटतात. मानसिक गुंता त्यांच्या ठिकाणी फार थोडा आहे. सरोजिनीमध्ये तर तो नाहीच. जगनचा चळवळीवर विश्वास असूनही मधेच तो जिनीला 'तू चळवळ सोडून द्यावीस' असे म्हणतो. सुरक्षित जीवन जगावे, की स्वतःला झोकून द्यावे हा सर्वसाधारणपणे चाकोरी सोडलेल्या मध्यमवर्गीयांच्या मनातला झगडा येथे ओझरता दिसतो. रेडकर मध्येच म्हणतो, 'पांढरपेशांचा जोर आहे; कितीसा टिकणार ?–बापू करंबेळकर बेचाळीसमध्ये हातात बाँब घेऊन फिरायचा ! पुढे काय झाला त्याचा लेबर ऑफिसर ! ' हे बोलही विचार करायला लावतात; पण एवढेच ! बाकी ही पात्रे एकसुरी, एकरंगी वाटतात.

नाटकाच्या प्रयोगात कोठे गबाळेपणा नाही. खुर्च्या, पलंगावरच्या साध्या चादरी, काही पुस्तके, बॅगा यांच्या सजावटीमुळे खोली मध्यमवर्गीयाची वाटते. एक गोष्ट खटकते. दाराच्या वरील अर्ध्या बाजूस गज आहेत. त्यातून बाहेर कोण आले आहे हे आतल्या माणसाला स्पष्ट दिसू शकते, तसेच बाहेरच्याही माणसाला आतले दिसू शकते. असे असताना पात्रे एकमेकांना न दिसल्यासारखी वावरतात. मालवणकरसाहेब बाहेरच्या बाजूने दाराशी उभे राहिलेले प्रेक्षकांना दिसतात आणि त्या दाराच्या समोरचे जसे काही मालवणकरांना काही दिसत नाही असे गृहीत धरून श्री. व सौ. पंडित आणि रेडकर यांची गडबड चालू असते तसेच मालवणकरसाहेबांच्या एकंदर रुबाबाला त्यांनी पाइप ओढताना आगपेटीतली काडी वापरणे शोभत नाही. त्यांनी जवळ लाइटर ठेवला असता तर बरे झाले असते.

सर्व व्यक्तींची चेहरेपट्टी, केशभूषा, वेषभूषा स्वतःच्या भूमिकेशी अतिशय योग्य आहे. प्रदीप भिडे (जगन) सीमा पोंक्षे (सरोजिनी) जुईली देऊसकर (सौ. पंडित) यांनी बोलणे, चालणे, हसणे सर्वच अभिनयाच्या बाजूंचे स्वतःच्या भूमिकेत भान सुन्दर ठेवले आहे. विशेष लक्षात राहते ती जुईली देऊसकर यांची सौ. पंडित. त्यांचे गडबडीने घरात येणे, चिडलेल्या नवऱ्याला सांभाळून आत नेणे, स्वयंपाकघराच्या दारातून नुसते डोकावून 'जगन' असे हाक मारण सारेच अगदी अकृत्रिम आणि सहजतेचे वाटते. शिवा बंदरकरच्या भूमिकेतील लक्ष्मीकांत बेडे आणि मालवणकरांच्या भूमिकेतील रवींद्र बेडे थोडक्या वेळात चमक दाखवून जातात. श्री. विश्वास मेहेंदळे यांना नंतरच्या दोन अंकातील खचलेला, चिडलेला, चिताग्रस्त पंडित उभा करणे चांगल्या प्रकारे साधले आहे; परंतु पहिल्या अंकातील विनोदी पंडित त्यांना जमलेला नाही. पहिल्या अंकातील त्यांनी उभा केलेला पंडित 'आनंदी जीव' वाटण्याऐवजी थिल्लर माणूस वाटतो. दीनानाथ टाकळकर यांचा अभिनय ठोकळेबाज आहे. हसतमुख–गंभीर, खेळकर – विचारी अशा रेडकरांच्या स्वभावातल्या छटा टाकळकरांच्या अभिनयात दिसू शकत नाहीत. विलास गुर्जर यांनी उभा केलेला बंडा बंदरकर एकंदर ठीक वाटतो.

'पंडित, आता तरी शहाणे व्हा !' या नावावरून हा फार्स आहे असे वाटते; परंतु हे विचारांना महत्त्व देऊ इच्छिणारे नाटक आहे. (विचारप्रधान असे म्हणता येणार नाही. ('पंडित, आता तरी शहाणे व्हा !' असे वाक्य दोनतीनदा आलेले असले तरी नाटकाच्या विषयाकडे पहाता नावात औचित्य नाही.

एकंदरीत 'विचार' हा आधार असूनही कथानकाला प्राधान्य दिल्यामुळे आणि प्रेक्षकांना हसविण्याच्या मोहात पडल्यामुळे तोल गेलेले परंतु बऱ्यापैकी स्वभावरेखन आणि नेटका प्रयोग यामुळे सुसह्य होणारे हे नाटक आहे. □

इंग्रजी चित्रपट

## The Reincarnation Of Peter Proud.
## सामान्य रहस्यकथा

गुडूप अंधरात बुडालेला एक पोहण्याचा तलाव. एखाद्या फिरत्या स्पॉटलाइटमध्ये पोहावे, त्याप्रमाणे छोटयाशा उजळ प्रकाशात पोहणारा एक तरुण. सगळीकडे निःशब्द, नीरव शांतता. फक्त त्या तरुणाच्या हात मारण्याने होणारे पाण्याचे 'चुबुक् चुबुक्'. तो तरुण थांबतो. दहा–पंधरा मीटरवर धूसर प्रकाशात एक पांढरी नाव. त्यात कोणी तरी बसलेले. तो पुन्हा हात मारू लागतो. नाव स्पष्ट होते, आत बसलेली तरुणीही.

'मला माफ कर, मार्शिआ, मी मघाशी नशेमध्ये विचित्र वागलो, वेडवाकडा बोललो; पण माझं तुझ्यावर प्रेम आहे, खूप खूप प्रेम आहे...'

असे म्हणत तो तरुण बोटीत चढू लागतो, तोच ती तरुणी उभी राहते, हातातील वल्ह्याचे जीवघेणे तडाखे त्या तरुणावर. 'आः ऽऽ' – घशात जिरत गेलेली आणि पाण्याच्या बुडबुडयांमध्ये विरत गेलेली किंकाळी.

–आणि याच वेळी घामाघूम झालेला, श्वासासाठी धडपडणारा प्रा. पीटर प्राउड जागा झाला. पुन्हा तेच स्वप्न, तोच प्रसंग, त्याच व्यक्ती आणि तीच प्रचंड धक्क्याने आलेली जाग. कित्येक दिवस, महिने, वर्षे हे स्वप्न त्याचा पाठपुरावा करीत आहे. त्या जोडीलाच चार खांब, एक पुतळा, एक मनोरा, एक घर, रंगीत तावदानांची एक खिडकी आणि अशाच काही प्रसंगांचे तुकडे.

या स्वप्नाने पीटर जागेपणीही अत्यंत अस्वस्थ होता. अनेक मनोरुग्णतज्ज्ञांकडून घेतलेले उपचार निरुपयोगी ठरल्यानंतर अचानक एक दिवस पीटरला त्या स्वप्नामधील गावाचा शोध लागला. गावातील पुलाचे चार खांब, तोच पुतळा, तोच मनोरा, तेच घर, तीच खिडकी पीटरला आपल्या पूर्वजन्मातील घटना–विशेषतः पूर्वजन्मी आलेला मृत्यू त्या स्वप्नातून दिसत होता. पूर्वजन्मी तो होता जेफ्री कर्टिस आणि मार्शिआ त्याची बायको. तिनेच त्याचा खून केला होता. छोटया छोटया दुव्यांच्या साह्याने पीटरने ही साखळी शोधून काढली आणि मार्शिआपर्यंत तो पोहोचला; पण जेफ्री आणि मार्शिआच्या तरुण मुलीसाठी-ॲनसाठी त्याने ही स्मृती पुन्हा पूर्वजन्मातच ढकलून द्यायचे ठरविले. मार्शिआला मात्र आपण केलेल्या खुनाची या माणसाला माहिती आहे एवढे ध्यानात आले होते. ती माहिती याला कशी हेही कळल्यानंतर एक दिवस–

तसाच तलाव. तसाच उजळ प्रकाश. तशीच शांतता. तशीच बोट. तशीच मार्शिआ.

फक्त या वेळी जेफ्री कर्टिसच्या जागी पीटर प्राउड (म्हणजे जेफ्रीच?) आणि वल्ह्याच्या जागी पिस्तुल. बोटीकडे येणाऱ्या पीटरला मार्शिआ म्हणते,

'तू मृत्यूनंतर परतायला नको होतंस, जेफ. माझं आणि ॲनचं जीवन त्यामुळं नासवलं जातंय. तुला परत जावं लागेल, जेफ, जावंच लागेल!'

गोळीचा एक आवाज आणि पीटर प्राउड आणि त्याच्यामध्ये जिवंत झालेला जेफ्री कर्टिस पाण्याच्या तळाशी शांत पहुडतात.

माणसाला जर पूर्वजन्मीची किंवा विशेषतः पूर्वजन्मी आपल्याला मृत्यू कसा आला, याची जाण मिळाली तर काय होईल, ते चितारणारी ही कथा The Reincarnation of Peter Proud' या चित्रपटाची.

अशी पूर्वस्मृती मिळालेला माणूस आणि त्याच्या भोवती वावरलेल्या पूर्वजन्मीच्या व्यक्ती यांच्या आयुष्यावर त्या पूर्वस्मृतीमुळे घडलेला परिणाम दाखविणे हा चित्रपटाचा हेतु असणे उघडच होते. पूर्वजन्माची आठवण या मूळ कल्पनेमुळेच कथेला एक गूढताही मिळाली होती. या गूढतेमुळे आणि जन्म–मरणाच्या चक्रातील असा स्मृतीचा अपवाद काढून टाकून त्या चक्राला अबाधित राखणाऱ्या शेवटामुळे (जेफ्री कर्टिसचा–या जन्मीच्या पीटर प्राउडचा मृत्यू) नियतीचा अटळपणाही जाणवत होता; पण चित्रपटातील अन्य काही गोष्टींमुळे या थोडयाशा जाणवणाऱ्या गोष्टी जितक्या प्रमाणात व्हायला हव्या तितक्या ठळक झाल्या नाहीत.

पूर्वजन्मातील स्मृती पीटरला स्वप्नामुळे प्रत्ययाला येत असल्यामुळे तो बराच काळ 'ही गतजन्मीची आठवण आहे का?' याबद्दल साशंक असतो; त्यामुळे त्या कल्पनेमध्ये असणारी गूढता नष्ट होते आणि तिची जागा एखादे सामान्य रहस्य घेते. टी. व्ही. वरील कार्यक्रमामुळे अचानक कळलेला स्वप्नातील गावाचा ठावठिकाणा आणि नंतर घडलेले काही योगायोग, एखाद्या गुप्तहेराला लाजवील अशा हुपारीने पीटरने अनेक ठिकाणाहून शोधून काढलेले दुवे यांमुळे कथेचा गूढतेचा पदर नष्ट होऊन ती एक सामान्य रहस्यकथा बनते.

याच आधीच्या योगायोगांमुळे आणि नंतर मिळालेल्या अनेक दुव्यांच्या साखळीमुळे अटळ शेवटाकडे चाललेला पीटर प्राउडचा प्रवासही कृत्रिम आणि नियतीऐवजी माणसानेच घडविल्यासारखा वाटू लागतो.

राहता राहिला भाग कथेतील व्यक्तींच्या आयुष्यावरील परिणामांचा. हा परिणाम साहजिकच त्या त्या व्यक्तिरेखांच्या चित्रणातून आपल्या डोळ्यांपुढे येणार. अशा महत्त्वाच्या व्यक्ती तीनच–पीटर प्राउड, मार्शिआ कर्टिस आणि ॲन कर्टिस; पण ज्या घटनांमधून हे व्यक्तिचित्रण रेखाटले जाते, त्या घटना दर्शविताना या तिघांच्या स्वभाववैशिष्टयांची बारीक कलाबूत दाखविण्याऐवजी त्या घटनांमधील नाट्यमयतेलाच फक्त प्राधान्य दिल्यामुळे सर्व घटना आक्रस्ताळ्या आणि ढोबळ बनल्या आहेत. त्यातून बाहेर येणाऱ्या गोष्टीही अशाच ठोकळेबाज–उदाहरणार्थ, टेनिस खेळताना 'Good shot!' असे ओरडणे किंवा ग्लासवर टिचक्या मारून 'टिंग टिंग' असा ताल धरणे अशा काही गोष्टींमधून जेफ्री कर्टिस आणि पीटर प्राउड यांच्यामधील साम्य मार्शिआला जाणवते. काही थोडया घटना मात्र याला अपवाद म्हणून अतिशय सुरेख उतरल्या आहेत. उदाहरणार्थ–पीटर प्राउड जेफ्रीच्या आईला भेटण्यासाठी जातो. म्हातारी वयामुळे इतकी थकलेली की, ती दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला ओळखीत नाही, अगदी स्वतःच्या नातीलासुद्धा! फक्त दुसऱ्याचे अस्तित्व तिला जाणवायचे; पण पीटरला पाहिल्याबरोबर तिच्या डोळ्यांत ओळखीची चमक पेटते आणि त्याला मिठीत घेऊन ती हुंदके देत म्हणते, 'जेफ, जेफ, तू इतके दिवस कुठे होतास रे? मला म्हातारीला भेटायला का आला नाहीस?' या प्रसंगातील म्हातारीचा आधीचा तो कोरा, मुखवटयासारखा चेहरा आणि नंतर तिच्या नजरेतील पोराला ओळखल्याची खूण केवळ अविस्मरणीय! पीटरच्या जेफ्री कर्टिसपणालाही इतर फुटकळ प्रसंगांपेक्षा या प्रसंगामुळे एक विलक्षण आवाका मिळतो. संपूर्ण चित्रपटातही व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने मार्शिआ कर्टिसलाच जास्तीत जास्त वाव मिळालेला. प्रत्येक प्रसंगात फक्त तिच्याच प्रतिक्रिया दाखविल्या आहेत. समाधान एवढेच की मार्गारेट केडर या अभिनेत्रीने मार्शिआ अतिशय चांगली उभी केली आहे. पूर्वायुष्यात आपल्या हातून घडलेल्या घटनेने मनावर निर्माण झालेला जबरदस्त ताण, पीटरच्या अचानक आगमनामुळे आणि त्याच्या वागण्यामुळे निर्माण झालेला संशय, वस्तुस्थिती कळल्यानंतर जेफला परत धाडण्याचा तिने केलेला निश्चय आणि या सगळ्या मानसिक संघर्षामुळे, वारंवार होणाऱ्या मनातील स्फोटांमुळे तिच्या वागण्यात डोकावणारा बेबंदपणा अनेक घटनांमधून साकार होतो. त्या मानाने जेनीफर ओनील या अत्यंत गुणी अभिनेत्रीला मिळालेली ॲनची भूमिका संपूर्णतया दुर्लक्षित राहिलेली. ही संपूर्ण कथा ज्याच्याभोवती गुंफलेली तो पीटर प्राउड उभा केला आहे मायकेल साराझीनने. चेहऱ्याची घडी थोडीही विसकटणार नाही, याची या गंभीर मुखवटयाच्या नटाने नीट काळजी घेतल्याने त्याला प्रा. पीटर प्राउड आणि जेफ कर्टिस–पीटर प्राउड दोन्ही पेलले नाहीत. अपवाद फक्त स्वप्नाच्या प्रसंगाचा. तोच फक्त त्याने नेटका रंगविला आहे. याच कारणामुळे असेल कदाचित; पण पीटर प्राउडच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेकडे संपूर्ण दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते. स्वप्नामुळे त्याच्या आयुष्यात झालेली अस्वस्थता, त्या स्वप्नामागील वस्तुस्थिती कळल्यानंतर होणारी त्याची तगमग, पूर्वजन्मी आपला खून केल्याने मार्शिआबद्दल वाटणारा तिरस्कार आणि या जन्मी ॲनबद्दल वाटणारे प्रेम या द्वंद्वात अडकलेले पीटरचे मन असे त्याच्या मनाचे कित्येक धागे नीटपणे डोळ्यांपुढे येतच नाहीत.

मॅक्स एलिचच्या कादंबरीवरून दिग्दर्शक जे. ली थॉम्प्सन यांनी हा चित्रपट तयार केला.

या चित्रपटाचे जे पोस्टर लागले होते, त्यांतून चित्रपटाची गूढता अतिशय जाणवत होती. वितळत जाणाऱ्या तांबडया पार्श्वभूमीवर पाण्यात विसकटलेल्या प्रतिबिंबासारखा जेफ कर्टिस बोटीत चढतानाचे दृश्य होते; पण प्रत्यक्ष चित्रपटाच्या छायाचित्रणात मात्र अशी वैशिष्टये टिपणारे काही नव्हते. सगळी चित्रे अत्यंत स्पष्टपणे मांडीत जाणारे टेक्निकलरमधील चित्रण.

चित्रपटाला जेरी गोल्डस्मिथने दिलेल्या संगीतातही विशेष असे काहीच नाही.

थोडक्यात काहीशा सरळसोट मांडणीमुळेच चित्रपट गूढतेऐवजी सामान्य रहस्यतेच्या पातळीला आला.

**–सदानंद बोरसे**

# अवती-भवती : पृष्ठ ३ वरून

शक्यता नव्हती. ही अशी संधी पुन्हा लवकर मिळणे शक्य नव्हते. सगळ्यांनी मिळून ठरविले, पोराला पळवायचे ! घेतल्या निर्णयाची लगोलग अंमलबजावणी होणे आवश्यक होते. आजूबाजूला कोणी नाही याची पुन्हा एकदा खात्री करून घेऊन, मुरियांनी अचानकपणे समोरून जाणाऱ्या त्या गृहस्थाच्या हाताला हिसडा दिला आणि पोर पळविले ! दोन-चार मिनिटे काय होतेय, याचाच पत्ता त्या गृहस्थाला लागेना. तो सावरून उभा राहिला तर तीन–चार मुरिया आपल्या पोराला पळवीत असून पोर मदतीसाठी ओरडत आहे हे त्याच्या लक्षात आले. क्षणाचीही उसंत न घेता तो जिवाच्या आकांताने धावू लागला. आपला पाठलाग होतो आहे हे लक्षात येताच मुरयाही पोराला बकोटीला मारून पळू लागले. पोराच्या बापाने मदतीसाठी आरडाओरड चालूच ठेवली होती; पण रस्त्यावर विशेष वर्दळ नव्हती आणि एखाद–दुसरा इसम असलाच तर कशाला उगाच या मुरिया मंडळींच्या भानगडीत पडा अशा विचाराने दुर्लक्ष करून पुढे जात होता. कोणी मदतीला येत नाही हे पाहून बाप आणखी चवताळला आणि त्याने पाठलाग चालूच ठेवला.

## पैसे देतो-पोर सोडा !

काही वेळातच त्याने पोर घेऊन पळणाऱ्या त्या मुरियांच्या गटाला गाठले. ताकदीच्या जोरावर काम होण्यासारखे नाही आणि कोणाची मदतही मिळवण्यासारखी नाही हे लक्षात आल्याने त्या व्याकूळ बापाने मुरियांना लालूच दाखविण्यास प्रारंभ केला. थोडा वेळ त्यांची गयावया करून तो म्हणाला, 'मी पैसे देतो; पण पोर परत द्या ! ' मुरिया दाद देईनात. या मुरियांना तांदुळांचा, तसेच पाळीव प्राण्यांचा लोभ असतो म्हणून त्याने याही गोष्टींची लालूच दाखविली; पण तरीही मुरिया बधेनात. ज्या अर्थी मुरिया एवढी लालूच दाखवूनही आपला मुलगा परत देत नाहीत त्या अर्थी पोराला बळी देण्यासाठीच नेले जात असावे हे त्याच्या लक्षात आले; पण वस्तुस्थितीबद्दल कल्पना येऊनही त्याला काही करता येईना. बापाच्या विनविण्यांना भीक न घालता त्यालाच मारपीट करून मुरिया त्या पोरासह कोहापल्ली येथे येऊन पोचले. इकडे बाप वेंकटपुरम् या नजीकच्या पोलिसचौकीवर येऊन दाखल झाला. बस्तारमधील आदिवासींनी आपल्या पोराला पळविल्याची तक्रार त्याने गुदरली. पोलिसांनी आय. पी. सी. च्या ३६३ व्या कलमाखाली गुन्हा दाखल करून घेतला. आपल्या पोराला बळी देण्यासाठी पळवून नेले असावे असा आपला वहीमही त्याने बोलून दाखविला. तिव्वापूरच्या गावकऱ्यांकडे पोलिसांनी चौकशी केली तेव्हा त्यांनीही या गोष्टीत तथ्य असण्याची शक्यता बोलून दाखविली. विशेषतः पैशाच्या लोभाने पोरे पळविण्याचा प्रघात नसल्याने पोराला बळी देण्यासाठीच पळविले असावे असा पोलिसांचाही ग्रह झाला. बापाने पोलिसांकडे तक्रार नोंदविली आणि तेवढे करून तो स्वस्थ बसला नाही. त्याने स्वतःही प्रयत्न चालू ठेवले. कोठापल्ली हे गाव उसर पोलिसस्टेशनच्या हद्दीत असल्याने त्या स्टेशनलाही खबर देण्यात आली. तसेच संपूर्ण बस्तार जिल्ह्याच्या जगदाळपूरच्या पोलिस सुपरिंटेंडेन्टनाही या प्रकाराबाबतची सर्व माहिती देण्यात आली. लगोलग बळी देण्याचा प्रकार बस्तार जिल्ह्यात कोठे झाला आहे काय याची कसून चौकशी सुरू झाली. तथापी असा प्रकार घडला नसल्याची माहिती सर्व पोलिसठाण्यांतून पुरविण्यात आली. बस्तार जिल्हा हा आदिवासींचा म्हणून ओळखला जात असलेला भाग मध्यप्रदेशात असला तरी ज्या आदिवासींनी मुलाला पळविले ते आदिवासी कोठापल्लीचे होते. हा भाग आंध्रप्रदेशात येतो. म्हणून जगदाळपूरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जमा केलेली सारी माहिती उसर पोलिसस्टेशनवर पोचविली. बस्तारमधील अधिकारी उसर पोलिसस्टेशनवर आले. कोठापल्लीच्या काही संशयितांना पकडण्यात आले. त्यांच्यावर अनेक प्रश्नांची फैर झाडल्यावर कोठापल्लीच्या कोतवालाला अधिक चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्याला वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्यांसमोर हजर करण्यासाठी वेंकटपुरम् येथे नेण्यात आले; परंतु पोलिसचौकीतून निसटून जाण्यात त्याने यश मिळविले. ही बातमी तिव्वापूरला पोचताच पोराला नक्कीच बळी देण्यात आले असावे असा मुलाच्या वडिलांचा आणि गावकऱ्यांचा समज झाला. मुलाचा तपास पुन्हा जोराने सुरू झाला; पण पोर काही हाती लागले नाही !

मानवी बळी दिल्याने देव प्रसन्न होतो असे बस्तारमधील आदिवासी अजूनही मानतात. रक्ताचा शिडकावा झाल्याने नापीक जमीनही लागवडीस योग्य ठरते आणि सुपीक जमिनीची उत्पादनक्षमता वाढते असा त्यांचा समज आहे. रक्ताने देव प्रसन्न झाला तर वृष्टी होते. कोरडे पडलेले तलाव पाण्याने भरून जातात असाही एक समज त्या जमातीमध्ये दृढमूल झालेला आहे. प्रगत नागरी जीवनापासून हा समाज अजूनही फार दूर आहे. त्या जमातीमध्ये 'विजा पंडूम' नावाचा एक सोहळा एप्रिल-मेच्या दरम्यान साजरा करण्यात येतो. या सोहळ्यापूर्वी सारे आदिवासी शिकारीला जातात. शिकार जितकी चांगली होईल तितके शेतीउत्पादन वाढेल असा समज असल्याने आदिवासींचा सारा गावच शिकारीला बाहेर पडतो. शिकार करून जे प्राणी आणलेले असतात त्यांचे ताजे गरम रक्त एकत्र करण्यात येते आणि पेरायचे सारे बी-बियाणे त्या रक्तात भिजविण्यात येते. 'विजा पंडूम' सोहळ्यापूर्वी शिकारीस येणे, अथवा रक्तामध्ये बी–बियाणे भिजविणे यासारख्या गोष्टी करण्याचे एखाद्याने नाकारले तर त्याने जमातीचा विश्वासघात केला असे समजण्यात येते. काही आदिवासी धर्मगुरू या विधीसाठी मानवी रक्त मिळाले तर फार चांगले असे मानीत असल्याने आणि वर तिवापूरच्या ज्या मुलाचा उल्लेख केला आहे त्या मुलाला नेमके या 'विजा पंडूम' महोत्सवकाळातच पळविले गेले असल्याने त्याचा बळी देण्यात आला असावा असा समज आहे. जमात कितीही मागासलेली असली तरी आज अठ्ठ्याहत्तर सालातही अंधश्रद्धेचे हे असे अजब प्रकार घडतात, या गोष्टीचे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही.

या प्रकाराबाबत आदिवासी केवळ जास्त काळजी घेतात इतकेच नव्हे तर एखादा गुन्हेगार सापडलाच तर त्याला सोडविण्यासाठी सारे एकत्र येतात. ज्याचा मुलगा पळविला असेल त्यालाही फितविण्यात ही मंडळी कमी पडत नाहीत. जगदाळपूर येथील एक वकील प्रताप अग्रवाल यांनी याबाबतची एक हकीगत प्रसिद्ध केली आहे. ते म्हणतात, आदिवासी गुरूंनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे बस्तारमधील आदिवासींनी एका चार वर्षांच्या मुलाला पळविण्याचा प्रयत्न केला. झोपेत असलेले ते मूल ओरडू लागल्याने घरातील अन्य मंडळी जागी झाली आणि त्यांच्या प्रतिकाराला घाबरून आदिवासी पळून गेले. पुढे गुन्हेगार पकडण्यात आले. त्या साऱ्यांनी पंचासमोर कबूल केले की, विश्रु नावाच्या गुरूच्या सांगण्यावरून जयरामच्या मुलाला बळी देण्याच्या हेतूने पळविण्याचा प्रयत्न आम्ही केला. पुढे या प्रकरणी खटला दाखल करण्यात आल्यावर आरोपी व साक्षीदार तर उलटलेच; पण ज्या जयरामच्या मुलाला पळविण्यात आले होते त्या जयरामनेही साक्ष फिरविली आणि सारे आरोपी निर्दोष सुटले! ☐

## राजधानी दिल्ली : मुखपृष्ठ २ वरून

साला अग्रक्रम दिल्याशिवाय ग्रामीण भागातील दारिद्र्य दूर होणार नाही हा चरणसिंगांच्या आग्रहाचा विषय समजण्यासारखा आहे; परंतु गेल्या वर्षभरातील जनता पक्षाच्या निराशाजनक कारभाराबद्दल चंद्रशेखर यांना दोषी ठरविण्यासाठी त्यांनी जो युक्तिवाद केला तो मात्र पटण्यासारखाही नाही. त्यांनी असे म्हटले आहे की, कालपर्यंत जे लोक अवजड उद्योगधंद्यांचा पुरस्कार करीत होते, त्यांनीच सत्तास्थाने काबीज केलेली असल्यामुळे हे असे घडले. या टीकेचा रोख चंद्रशेखर यांच्यावर आहे, हे चरणसिंगांनी त्यांचे नाव घेतलेले नसले तरी सहज कळून येते. अशा तऱ्हेने इतरांवर दोषारोप करून चरणसिंग स्वतःची सुटका करून घेऊ इच्छित असले तरी ते त्यांना जमण्यासारखे नाही. म्हणूनच चंद्रशेखर यांनी लगेच फटकारले. केंद्र सरकारचे आर्थिक धोरण ठरविण्याची जबाबदारी पंतप्रधान, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि उद्योगमंत्री यांची असताना, जर सरकारी धोरण बड्या उद्योगपतींच्या बाजूने झुकले असेल तर इतर तीन मंत्र्यांप्रमाणे गृहमंत्रीही त्याला तितकेच जबाबदार आहेत. असा चंद्रशेखर यांनी प्रतिटोला दिला आहे. चरणसिंगांनी चंद्रशेखर यांच्याविरुद्ध टीकास्त्र सुरू केल्यानंतर राजनारायण यांच्यासारखा बोलभांड गृहस्थ स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. पक्षाचे कामकाज नीट चालत नसल्याबद्दल आपण पंतप्रधानांना पत्र लिहिले असल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले. इतकेच नव्हे तर वेळोवेळी आपण चंद्रशेखर यांना लिहिलेली आठ पत्रेही लवकरच प्रसिद्ध करू अशी धमकी दिली. आपल्या पत्रांना चंद्रशेखर उत्तर देण्याचे टाळतात असेही राजनारायण यांचे म्हणणे आहे. या असल्या बालिश टीकेला आपण मुळीच उत्तर देणार नाही असे चंद्रशेखर यांनी सांगून टाकले असल्यामुळे कदाचित राजनारायण लवकरच ती पत्रे प्रसिद्धही करतील आणि मग जनता सरकारच्या असमाधानकारक कामकाजाला जबाबदार कोण हा वाद पुन्हा चिघळू लागेल.

हा वाद वाढावा, नव्हे विकोपाला जावा असाच चरणसिंग-राजनारायण यांचा मनसुबा दिसतो. जनता पक्षाची सभासद नोंदणी येत्या ३१ जुलैपर्यंत चालू राहणार असून त्यानंतर तीन महिन्यांच्या आत जिल्हा पातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंतच्या सर्व निवडणुका घेण्याचे ठरले आहे. त्या वेळी चंद्रशेखर यांना पुन्हा अध्यक्षपद मिळू नये याकरिताच चरणसिंग यांनी आतापासून ही मोहीम हाती घेतली आहे. राजनारायण यांना किंवा त्यांच्यासारख्या दुसऱ्या एखाद्या आपल्या खास माणसाला अध्यक्षपद मिळावे, म्हणजे आपोआपच पक्षावरील आणि पर्यायाने केंद्रात शासनावरील आपली पकड पक्की होईल या विचारातूनच चरणसिंग यांनी हा पवित्रा घेतलेला आहे. तीन राज्यांतील 'आपल्या' मुख्यमंत्र्यांना हात लावण्याचा कोणी विचार केला की, चरणसिंग खवळतात, यामागेही आपले वर्चस्व अबाधित राहावे हाच उद्देश असतो; परंतु चरणसिंगांच्या महत्त्वाकांक्षेने कितीही झेप घेतली तरी त्यांना स्वतःच्या बळावर ती सिद्धीला नेता येणार नाही. त्याबाबत त्यांची मदार जनसंघाच्या सहकार्यावर आहे. गेल्या वर्षभरामध्ये पक्षात जेव्हा जेव्हा पेचप्रसंग निर्माण झाला तेव्हातेव्हा जनसंघाने आपले वजन भारतीय लोकदलाच्या पारड्यात टाकले असले तरी, मोरारजी देसाई यांना दुखवायलाही जनसंघाची तयारी नाही हेही या कालावधीत दिसून आले आहे. कारण जनता पक्ष स्थापन झाल्यापासून मोरारजीभाई कधीही या वा त्या गटाच्या बाजूने कललेले नाहीत. समाजवादी ज्याप्रमाणे स्वतःपाशी काहीही सामर्थ्य नसताना जनसंघाला दुखावण्यातच आपल्या पत्रकबाजीची इतिकर्तव्यता मानतात तसा कोणताही पक्षाच्या एकजुटीला तडा जाईल असा अश्लाघ्य प्रकार मोरारजीभाईंनी कधीही केलेला नाही. जनसंघ आणि भारतीय लोकदल यांच्या आधारावरच उत्तर भारतीय राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुका जिंकता आल्या, ही वस्तुस्थिती मनोमन स्वीकारण्याचे सामंजस्य मोरारजीभाईंपाशी आहे. त्यापैकी भारतीय लोकदलाचा एकमेव आधार म्हणजे चरणसिंग. जनसंघाबाबत त्यांच्या विरोधकांनाही तसे म्हणता येणार नाही. निःस्वार्थ भावनेने सार्वजनिक कार्य करणाऱ्यांची फळी फक्त त्या पक्षापाशीच आहे. जनता पक्षात समाविष्ट झाल्यामुळे जनसंघाचा फायदा झाला हे जसे खरे आहे तशीच ही देखील वस्तुस्थिती आहे की, जनता पक्षाच्या सामर्थ्यात जनसंघाचाच वाटा सर्वांत अधिक आहे. यासंबंधीचा विवेक जेवढा मोरारजीभाई दाखवितात तेवढा चरणसिंग वा जगजीवनराम दाखवीत नाहीत. त्यामुळे पंतप्रधानपदावर मोरारजीभाईच राहिले पाहिजेत असे अटलबिहारी बाजपेयी आणि लालकृष्ण अडवानी यांना वाटते. चरणसिंगांचा माणूस जर पक्षाध्यक्षपदी आला तर केंद्रीय मंत्रिमंडळात आज जो एकोपा आहे तोही नाहीसा व्हायला प्रारंभ होईल याची त्यांना जाणीव आहे. म्हणून चंद्रशेखर यांच्या जागी राजनारायण यांना आणण्याच्या खटाटोपात चरणसिंगांना जनसंघाकडून साहाय्य मिळण्याचा संभव नाही. तरीही राजनारायण यांनाच अध्यक्ष करण्याचा आपला हेका चरणसिंगांनी चालू ठेवला तर त्यांना समाजवादी आणि लोकशाहीवादी काँग्रेस या दोन घटक पक्षांच्या विरोधामध्ये उभे राहावे लागेल.

पक्षसंघटनेतील निवडणुकांच्या वेळी हे असे घडावे अशी इंदिरा गांधी यांनी अपेक्षा करीत असावे हे स्वाभाविक आहे. स्वर्णसिंग काँग्रेसबरोबर समझौता करायला त्या मुळीच उत्सुक नाहीत. आपली काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे एवढे सिद्ध करण्यासाठी स्वर्णसिंग काँग्रेसमधील जेवढे प्रादेशिक सुभेदार आपल्याकडे येणे आवश्यक आहे, तेवढ्या लोकांपुरतीच इंदिरा काँग्रेसची दारे खुली राहतील. कर्नाल आणि आझमगढ येथल्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीत स्वर्णसिंग काँग्रेसच्या उमेदवारांच्या अनामत रकमाही जप्त झाल्या. त्यामुळे लोकांच्या दृष्टीने इंदिरा काँग्रेस हाच खरा काँग्रस पक्ष आहे हे सिद्ध झालेलेच आहे. इंदिरा गांधींना तशी मान्यता निवडणूक-आयोगाकडूनही हवी आहे. त्या दृष्टीने त्यांना जे बळ अपुरे पडत आहे, ते पुरविण्याची कामगिरी मोहनलाल सुखाडिया आणि सिद्धार्थशंकर राय लवकरच पार पाडतील. ते होऊन एकदा स्वर्णसिंग काँग्रेसची अवस्था जुन्या संघटना काँग्रेससारखी झाली की, मग इंदिरा गांधींच्या हिशोबी त्या पक्षाच्या नाममात्र अस्तित्वाला काहीच अर्थ राहणार नाही. आपल्या पक्षाने आंध्रप्रदेश आणि कर्नाटक येथील सत्ता संपादन केलेली असली तरी उत्तर भारतामध्ये नजीकच्या भविष्यकाळात तरी एवढे यश मिळणार नाही हे इंदिरा गांधींना ठाऊक आहे. म्हणून त्यांना जनता पक्षाच्या दुफळीमध्ये विशेष रस वाटत आहे. आक्रस्ताळे समाजवादी आणि आपल्यावर अन्याय झालेला अशी भावना मनात धुमसत ठेवणारे जगजीवनरामांचे लोकशाहीवादी काँग्रेसजन यांनी जर आपला सवता सुभा उभारला तर त्याचे स्वागत करायला इंदिरा गांधी तयारच आहेत. जगजीवनराम पंतप्रधान झाले तर आपला पक्ष त्यांना पाठिंबा देईल असे जाहीर करून इंदिरा गांधींनी हेच सूचित केले आहे. या आश्वासनाचा मोह जगजीवनरामांच्या गोटातील काही जणांना इतका पडलेला आहे की, लवकरच आपल्या पक्षाची वेगळी बैठक बोलावून जनता पक्षात राहायचे की नाही याचा कौल घ्यावा असे ते सुचवू लागले आहेत. मोरारजीभाईंना आणि चंद्रशेखरना विरोध करण्याच्या हव्यासापायी आपण कोणते संकट ओढवून घेणार आहोत याचा चरणसिंगांना बोध झाला तरच राजनारायण यांच्यासारख्या विदूषकाच्या आहारी जाण्यापासून ते स्वतःला सावरू शकतील. □

कपूर घराण्याच्या तीन पिढ्या सिनेमा जगत आहेत.
पण कलाकार, दिग्दर्शक, निर्माता या विविध अंगांनी
सिनेमा सजवला–फुलवला राजकपूरने.
लोकप्रिय चित्रपटांची खैरात करूनही
स्वतःची शान संभाळून
तो राजासारखा या क्षेत्रात तीस वर्षे वावरला.
बरसात, आवारा, संगमचे
नेत्रदीपक यश त्याने पाहिले
आणि स्वतःचे अस्तित्वच धोक्यात आणणारे
जोकरचे अपयशही त्याने पचवले.
आज चित्रपट मंडळी सत्यमच्या यशाची
कुंडली मांडून बसलेली असतानाच
त्याच्या तीस वर्षांच्या या चढउताराचा
मागोवा घेणारा....

# साप्ताहिक माणूस
# बरसात विशेषांक

सादरकर्ते : शरद गोखले

प्रसिद्धी : लवकरच